# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक २८ जून, २०१९ / आषाढ ७, १९४१ ( शके )**

| | |
|---|---|
| (१) महसूल, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री<br>(२) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री<br>(३) मदत व पुनर्वसन मंत्री<br>(४) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री<br>(५) फलोत्पादन मंत्री<br>(६) कृषी मंत्री | यांचे प्रभारी विभाग |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ८३**

---

## मुंबईतील ‘राज्य कामगार विमा’ योजनेतील छोटी रुग्णालये आणि औषधांची दुकाने सुरु करण्याबाबत

**(१) * १३५९०५ श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ‘राज्य कामगार विमा’ योजनेतील दीड हजारांपेक्षा अधिक छोट्या रुग्णालयांसह योजनेतील प्रमुख सहा रुग्णालयांना औषध पुरवठा करणारी सहाशे पन्नास औषधांची दुकाने बंद झाली असल्याचे दिनांक ४ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामगार विमा योजनेचा परतावा वेळेवर न मिळणे, योजनेचे कार्ड बंद होणे, औषधांची उपलब्धता नसणे इत्यादी कारणांमुळे विमा योजनेचा लाभ गरजू कामगारांसह त्यांच्या कुटुंबियांना मिळण्यात अडचणी येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,
(४) असल्यास, त्यानुसार मुंबईतील गरजू कामगारांसाठी कामगार विमा योजनेची रुग्णालये आणि औषधांची दुकाने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

सुमारे ३० वर्षापुर्वी राज्य कामगार विमा योजनेंतर्गत दीड हजार IMP व ८० registered chemist कार्यरत होते. तथापि, बदलत्या काळानुसार औद्योगिक परिस्थितीमध्ये झालेल्या मोठ्या बदलांमुळे मुंबईतील कॉटन मिल्स व इतर कारखाने बंद होऊन काही कंपन्या मुंबईच्या बाहेर गेल्या. त्यामुळे मध्यंतरीच्या काळात विमाधारकांच्या संख्येत घट होऊन त्यानुसार वेळोवेळी आवश्यक त्या प्रमाणात विमा वैद्यकीय व्यवसायींची नियुक्ती करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत मुंबईत ४२३ विमा वैद्यकीय व्यवसायी IMP आणि ०६ registered chemist कार्यरत असून १२ सेवा दवाखाने सुध्दा कार्यरत आहेत.
(२) हे अंशत: खरे आहे.

राज्य कामगार विमा महामंडळाने ऑनलाईन पोर्टल स्थापित केले असल्यामुळे विमा योजनेचा परतावा वेळेवर मिळत असून कार्ड बंद होण्याचे प्रकार सुध्दा होत नाहीत. हाफकीन महामंडळाकडून औषधी वेळेवर उपलब्ध न झाल्यामुळे निर्माण झालेला तुटवडा दुर करण्यासाठी राज्य कामगार विमा महामंडळामार्फत चार महिन्याच्या औषधांचा साठा उपलब्ध करुन घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(३) व (४) महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटीमार्फत अतिरिक्त IMP व registered chemist यांची नियुक्ती करण्यात येणार असल्याने चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील कोल्हापूर-रत्नागिरी राष्ट्रीय महामार्गावरील जुळेवाडी खिंडीतील पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(२) * १३५०५३ श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील कोल्हापूर-रत्नागिरी राष्ट्रीय महामार्गावरील जुळेवाडी खिंडीतील ब्रिटीशकालीन पूल अत्यंत महत्वाचा पूल असून पुलावरील कमी रुंदीचा रस्ता, चक्रीवळण, संरक्षक कठड्यांची झालेली दुरवस्था, नष्ट झालेली लोखंडी ग्रील व पुलावरील एकेरी वहिवाट इत्यादी अनेक कारणांमुळे सदर पूल धोकादायक झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्यावर व पुलावर अनेक अपघात होत असल्याने प्रवाशांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून जुळेवाडी खिंडीतील ब्रिटीशकालीन पुलाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील कोल्हापूर-रत्नागिरी राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६ वरील जुळेवाडी खिंडीतील ब्रिटीशकालीन पूलाचे ठिकाण कमी रुंदीचा रस्ता, चक्रीवळण व पूलावरील एकेरी वहिवाट अशा अनेक कारणांमुळे वाहतुकीस अवघड आहे. परंतु सदर पूल सद्यस्थितीत सुस्थितीत आहे.

(३) केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत सदर कोल्हापूर-रत्नागिरी राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६ चे चौपदरीकरण करण्याचे प्रस्तावित असून त्याअंतर्गत प्रस्तुत ठिकाणचे धोकादायक चक्रीवळण काढण्याचे प्रस्तावित आहे. सदयस्थितीत या राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६ चा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याचे काम सुरु आहे, असे प्रकल्प संचालक,भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, कोल्हापूर यांनी कळविले आहे. यास्तव सदर काम केंद्र शासनाच्या मंजुरीनंतर हाती घेण्यात येणार आहे. तसेच सदर पूलाच्या रेलींगच्या दुरुस्तीचे काम दुरस्तीअंतर्गत सदयस्थितीत प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मेळगांव (ता.नायगांव, जि.नांदेड) या गोदावरी नदीवरील वाळू घाटात अवैध उत्खनन होत असल्याबाबत

**(३) * १३९७७४ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळगांव (ता.नायगांव, जि.नांदेड) या गोदावरी नदीवरील वाळू घाटाच्या गट क्रमांक ५, ७, १४०, १४१, १४२ मधून नियम व अटीचे उल्लंघन करून २० पोकल्यांड मशिनद्वारे ८४८१ ब्रास वाळूचे उत्खनन उक्त वाळू घाट सोडलेल्या लिलावधारकाने महसूल विभागातील अधिकारी व कर्मचा-यांच्या सहभागाने केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उत्खनन केलेली सदर वाळू २०० आयवा वाहनांने वाहुन मेळगांव व सांगवी परिसरात या वाळुचा बेकादेशीर साठा केला जात असल्याचेही दिनांक १४ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार शासकीय नियमांचे उल्लंघन करून वाळू उत्खनन करणाऱ्या लिलावधारकांवर आणि याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकारी व कर्मचा-यांविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) दि.१४/५/२०१९ रोजी स्थानिक वृत्तपत्रामध्ये अशा प्रकारच्या बातम्या प्रसिध्द झाल्या आहेत.

(३) व (४) मौजे मेळगांव, ता.नायगांव या वाळूघाटातील उत्खननाच्या अनुषंगाने तांत्रिक तपासणी करण्यासाठी उपविभागीय अधिकारी, नायगांव यांना जिल्हाधिकारी, नांदेड यांच्या दि.३/६/२०१९ रोजीच्या पत्रान्वये आदेशित करण्यात आले आहे. प्रकरणात अहवाल प्राप्त झाल्यावर नियमानुसार कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात रब्बी हंगामातील पीक विमा योजनेत झालेला गैरव्यवहार

**(४) * १३६२६९ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात यावर्षीच्या रब्बी हंगामामधील पीक विमा योजनेत गैरव्यवहार झाला असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रब्बी हंगामात ३३.८१ लाख हेक्टर क्षेत्रफळ लागवडीखाली असताना पीक विमा क्षेत्राखाली ४५ लाख हेक्टर क्षेत्र असल्याचे निदर्शनास आले असुन लागवडीखालील क्षेत्र व पिक विमा क्षेत्र यामध्ये तफावत आढळून आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार रब्बी पीक हंगामामधील पीक विमा योजनेत गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अनिल बोंडे :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

तथापि, औरंगाबाद व लातूर विभागातील काही जिल्हयांमध्ये लागवडीखालील क्षेत्र व पीक विमा क्षेत्रामध्ये तफावत असल्याचे निदर्शनास आले असून, प्रस्तुत प्रकरणी जिल्हाधिकारी व संबंधित विमा कंपनी यांना तपासून योग्य ती कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिखली झोलेबाबा (ता.मंगरूळपीर, जि.वाशिम) येथील मॉडेल कॉलेजच्या बांधकामाबाबत

**(५) * १३९२३३ श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली झोलेबाबा (ता.मंगरूळपीर, जि.वाशिम) येथे माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान मा.पंतप्रधान यांच्या हस्ते मॉडेल कॉलेजचे भूमिपूजन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मॉडेल कॉलेजसाठी अद्यापपर्यंत जागा निश्चित करुन सार्वजनिक बांधकाम विभाग, वाशिम यांच्याकडे वर्ग झाली नसतानाही या मॉडेल कॉलेजचे काम पूर्ण करण्यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कॉलेजसाठी जागा उपलब्ध नसतानाही चुकीच्या जागेवर मा.पंतप्रधान यांच्या हस्ते भूमिपूजन करून घेणाऱ्या तसेच राज्य शासनाला चुकीची माहिती देणाऱ्या कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

उपभोक्ता विभागाकडून जागा प्राप्त झाल्यानंतरच निविदा प्रक्रिया करण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मराठा मंडळ, मुलुंड या संस्थेस शासनाने दिलेल्या भूखंडाबाबत

**(६) * १४१०५३ श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठा समाजाच्या उन्नतीसाठी मुलुंड (पूर्व), मुंबई येथील सर्व्हे नं.१२१ ते १२३ मधील सुधारीत अभिन्यासातील भूखंड क्र.१३ हा शासन ज्ञापन दिनांक २८ एप्रिल, १९८९ अन्वये मराठा मंडळ, मुलुंड या संस्थेस विदयार्थी वसतिगृह, वाचनालय, सांस्कृतिक केंद्र इत्यादी प्रयोजनार्थ काही अटी व शर्तीच्या अधीन राहून शासनाने मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूखंडावर या संस्थेमार्फत अद्यापपर्यंत विद्यार्थी वसतीगृह चालू केले नसून सदरहू भूखंडाचा वाणिज्यिक वापर न करण्याबाबत आदेशात नमूद असतानाही या भुखंडाचा वापर वाणिज्यिक व खाजगी वापरासाठी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार या संस्थेविरुध्द प्राप्त झालेल्या विविध तक्रारीच्या अनुषंगाने उक्त संस्थेवर कारवाई करुन भूखंड शासन जमा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे मुलुंड मधील स.नं. १२१ ते १२३ मधील सुधारित अभिन्यासातील भूखंड क्र.१३ हा शासन ज्ञापन दि. २८/४/१९८९ अन्वये मराठा मंडळ, मुलुंड या संस्थेस विद्यार्थी वसतीगृह, वाचनालय, सांस्कृतिक केंद्र इ. प्रयोजनार्थ प्रदान करण्यास काही अटी व शर्तीस अधिन राहून शासनाने मंजुरी दिली आहे. त्यानुसार सदर १५५०.७५

चौ.मी. मिळकतीचा ताबा संस्थेस दि. २९/१२/१९८९ रोजी देण्यात आला आहे. तद्नंतर शासन ज्ञापन दि. २१/१०/१९९४ अन्वये सुधारित अभिन्यासातील भूखंड क्र. १३ चे क्षेत्र रस्त्याच्या तळपृष्ठ निर्देशांकासह २१७१.०५ चौ.मी. असल्याने तेवढे क्षेत्र उपरोक्त प्रयोजनार्थ मंजूर करण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या अहवालानुसार, सदर जमिनीवर तळ मजला + ३ मजले अशी इमारत असुन तळमजल्यावर वाचनालय व मंडळाचे कार्यालय आहे. पहिल्या मजल्यावर सांस्कृतिक केंद्र सभागृह व दुसऱ्या मजल्यावर सांस्कृतिक केंद्र सभागृह/वधु-वर सुचक मंडळ आहे. तिसऱ्या मजल्यावर विद्यार्थी वसतीगृहासाठी ६ खोल्या सुस्थितीत असुन तिथे अभ्यासिका करण्यात आली आहे. तसेच, या संस्थेमार्फत कोणत्याही अटी व शर्तीचा भंग झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही आणि मराठा मंडळ संस्थेमार्फत सदर भुखंडाचा वाणिज्यिक व खाजगी वापर केला जात नसल्याचे निदर्शनास आल्याने संस्थेवर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भेंडाळी (ता.निफाड, जि.नाशिक) येथील सत्यम ॲग्रो इंडस्ट्रीज कंपनीच्या गोदामामध्ये बनावट खतांची होत असलेली विक्री

**(७) * १४०८१६ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भेंडाळी (ता.निफाड, जि.नाशिक) येथील सत्यम ॲग्रो इंडस्ट्रीज कंपनीच्या गोदामामध्ये बनावट खतांची विक्री होत असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सत्यम ॲग्रो इंडस्ट्रीज या कंपनीच्या संचालकांकडे केंद्र व राज्य शासनाचा कोणताही परवाना नसतांना रासायनिक खंतांची निर्मिती व विक्री करुन कंपनी शेतकऱ्यांची फसवणूक करत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार बनावट खतांची निर्मिती करुन विक्री करणाऱ्या संबंधित दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अनिल बोंडे :** (१) होय. हे खरे आहे.
(२) व (३) होय.

भेंडाळी, जि.नाशिक येथील सत्यम ॲग्रो इंडस्ट्रीज कंपनीची दि.१३/०५/२०१९ रोजी तपासणी केली असता, कंपनीकडे स्फुरदयुक्त सेंद्रिय खत व सेंद्रिय खत उत्पादन व विक्रीचा परवाना आढळून आलेला आहे.

तथापि, चार बनावट खतांचा कोणताही उत्पादन व विक्री परवाना नसताना शेतकऱ्यांना विक्रीसाठी अनधिकृत उत्पादन होत असल्याचे निदर्शनास आले.
(४) शासन व शेतकऱ्यांच्या फसवणूक प्रकरणी सत्यम ॲग्रो कंपनीचे जबाबदार व्यक्ती व संचालक यांचेविरुध्द सायखेडा पोलिस स्टेशन (ता.निफाड, जि.नाशिक) येथे दि. १४/०५/२०१९ रोजी भा.दं.वि. कलम ४२०, खत नियंत्रण आदेश १९८५ व अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत गु.र.नं. ११०/२०१९ अन्वये पोलिस केस दाखल केलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्हयातील शेतकऱ्यांना ठिबक सिंचन योजनेंतर्गत अनुदान मिळण्याबाबत

**(८) * १३६०४१ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हयात शासनाकडून ठिबक सिंचन योजना राबविण्यात येत असून या योजनेंतर्गत ऑनलाईन पध्दतीने सन २०१८-१९ मध्ये एकूण १३८ शेतक-यांच्या प्रस्तावांना मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू १३८ लाभार्थ्यांना मंजूर झालेले १६ लाखांचे अनुदान अद्याप प्राप्त झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार रत्नागिरी जिल्हयातील शेतकऱ्यांना ठिबक सिंचन योजनेचे अनुदान मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अनिल बोंडे :** (१) १५१ शेतकऱ्यांच्या प्रस्तावांना पुर्वसंमती देण्यात आली आहे.
(२), (३) व (४) पुर्वसंमती प्राप्त १५१ शेतकऱ्यांपैकी १४३ शेतकऱ्यांनी सुक्ष्म सिंचन संच उभारणी करुन अनुदानासाठीचे प्रस्ताव सादर केले आहेत.

अनुदानासाठीचे प्रस्ताव सादर केलेल्या ८४ शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर अनुदानाची रक्कम जमा करण्यात आली आहे. राज्य हिश्श्याच्या निधी अभावी उर्वरित शेतकऱ्यांना अनुदानाची रक्कम अदा करण्यात आलेली नाही. राज्य हिश्श्याचा निधी उपलब्ध करुन देऊन उर्वरित शेतकऱ्यांना अनुदानाची रक्कम अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मोडक सागर व वैतरणा (जि.ठाणे) धरण क्षेत्रात अवैध रेती उपसा होत असल्याबाबत

**(९) * १३८६५४ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या मोडकसागर व वैतरणा (जि.ठाणे) धरण क्षेत्रात रेती माफिया बांगलादेशी मजूरांच्या मदतीने बोटी उतरवून व मोठमोठया मशिनरी लावून अहोरात्र प्रचंड प्रमाणात अवैध रेती उपसा करुन धरणक्षेत्र खणून काढीत असल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अवैध उपशामुळे वैतरणा खाडीवरील रेल्वे पुलाला धोका निर्माण झाल्याचे रेल्वेने जिल्हाधिकाऱ्यांना कळविले असुन उपसा केलेल्या रेतीचा टेंभा, वैतरणा, अजनूप, कुंडण, गायदरा परिसरात साठा करुन रेती माफिया १० हजार रुपये प्रति ब्रासने सदर रेती विक्री करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार या रेती माफियांविरुद्ध कारवाई करुन मोडकसागर व वैतरणा धरणाच्या सुरक्षेसाठी उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) वैतरणा व मोडक सागर धरण परिसराच्या सुरक्षेसाठी बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच शासनामार्फत सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे.

वैतरणा धरण क्षेत्रात अवैध बोटींसह घुसखोरी आढळून आली नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२), (३), (४) व (५) तहसीलदार शहापूर यांच्या कार्यक्षेत्रामध्ये अवैधरित्या रेतीसाठा करणाऱ्या व्यक्तींविरुध्द तहसीलदार शहापूर यांचेमार्फत फौजदारी तसेच प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे.

तसेच, रेती १० हजार रुपये प्रति ब्रासने विक्री करीत असल्याचे निदर्शनास आले नसल्याचे जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे यांनी कळविले आहे.

सदर धरणांवरील सी.सी.टी.व्ही. कॅमेरे २४ तास चालू असतात असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

-----------------

## आर्वी (ता.श्रींगोदा, जि.अहमदनगर) येथे भीमा नदीपात्रात वाळूचे अवैध उत्खनन होत असल्याबाबत

**(१०) * १४१८६९ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी (ता.श्रींगोदा, जि.अहमदनगर) येथे भीमा नदीपात्रात अवैधरित्या वाळू उपसा करणाऱ्या वाळू तस्करांवर दिनांक ११ मे, २०१९ रोजी वा त्या सुमारास कारवाई करुन २ कोटी रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार उक्त नदीपात्रात वाळू तस्करी करणाऱ्यांवर कारवाई करुन भीमा नदीपात्रात होणारी वाळू तस्करी रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांचे अधिनस्थ स्थानिक गुन्हे शाखेने दि.११ मे, २०१९ आर्वी (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) गावाचे शिवारात भीमा नदीपात्रात वाळूचे अवैध उत्खनन करतांना आढळून आलेले ७ जे.सी.बी. व ६ ट्रॅक्टर तसेच ७.५ ब्रास वाळू असा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंदविण्यात आला असून एकूण ६ आरोपींना अटक करण्यात आलेली होती. सदर आरोपींची मा.न्यायालयाने जामीनावर मुक्तता केली आहे. सदर गुन्ह्याचा पोलीस तपास सुरु आहे.

सदर प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या वाहनांच्या संदर्भात तहसिलदार, श्रीगोंदा यांनी दि.१२/१/२०१८ रोजीच्या शासन अधिसूचनेतील तरतूदीनुसार दंडात्मक आदेश पारित केले आहेत.

गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीस आळा घालण्याच्या दृष्टीने जिल्ह्यात विशेष दक्षता पथके स्थापन करण्यात आली आहेत. त्यानुसार सन २०१८-२०१९ या कालावधीत श्रीगोंदा तालुक्यात गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीच्या ५४ प्रकरणात रु.४२,३३,६००/- लक्ष इतकी दंडात्मक रक्कम आकारण्यात आली असून १३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजा रायबासा (ता.सावनेर, जि.नागपूर) येथील जमीन बनावट कागदपत्राच्या आधारे अकृषक केल्याबाबत

**(११) * १४२२१८ श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केळवद (ता.सावनेर, जि.नागपूर) येथील रहिवासी मनोहरलाल गांधी यांनी मौजा रायबासा येथील सर्वे नंबर ३१२ व ३१२ आ. ८.२ हे.आर जमीन अकृषक करण्यासाठी बनावट कागदपत्राच्या आधारे सादर केलेल्या प्रस्तावाला जिल्हाधिकारी, नागपूर कार्यालयातील अधिकाऱ्यांनी नियमबाहयरित्या रा.पा.प्र.५७/एन.ए.पी.३४/२०१६-१७ दिनांक १ मार्च, २०१७ रोजीच्या आदेशान्वये मंजूरी दिल्याचे दिनांक १५ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ एप्रिल २०१८, २० एप्रिल, २०१८ व ८ मे, २०१८ रोजी जिल्हाधिकारी, नागपूर व विभागीय आयुक्त, नागपूर यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार या प्रकारणातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अर्जदार श्री.मनोहरलाल नथमल गांधी, रा.केळवद, जि.नागपूर यांनी त्यांच्या भोगवट्यात असलेली मौजा रायबासा, खसरा क्रमांक ३१२ व ३१३, अनुक्रमे आराजी ३.२० व १.६२ हे. आर एकुण आराजी ४.८२ हे.आर. (४८२०० चौ.मी.) प.ह.न.३८ तहसिल सावनेर, जि.नागपूर येथील जागा वाणिज्य (ॲग्रो प्रोडक्ट वेअरहाऊस) वापराकरीता अकृषक करण्याची परवानगी मिळण्याबाबत सादर केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने प्रश्नाधिन प्रकरणी सहाय्यक संचालक, नगर रचना, नागपूर यांची अंतिम मंजूरी, तसेच, तहसिलदार, सावनेर यांच्या अहवालानुसार / उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४२ अ मधील तरतुदींन्वये अकृषक आकारणी करुन, परीशिष्ट ब मध्ये विहीत

केल्याप्रमाणे, नियोजन प्राधिकरणाने बांधकाम / विकास परवानगी दिलेल्या जमिनीच्या भोगवटादारास द्यावयाच्या नमुन्यातील सनद जिल्हाधिकारी, नागपूर यांनी दि.०१/०३/२०१७ रोजी संबंधित अर्जदार यांना दिली आहे.

सदर प्रकरणी लोकप्रतिनिधी यांनी दि.०८ एप्रिल, २०१८ च्या पत्रान्वये विचारणा केल्याप्रमाणे प्रस्तुत प्रकरणाबाबतची चौकशी करून त्यासंदर्भातील वस्तुस्थिती जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांचेव्दारे दि.२/१/२०१९ च्या पत्रान्वये संबंधित लोकप्रतिनिधींना कळविण्यात आली आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## साजगाव-आडोशी (ता.खालापूर, जि.रायगड) या रस्त्याचे अर्धवट स्थितीत असलेले काम पूर्ण करण्याबाबत

**(१२) * १३८५११ श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साजगाव-आडोशी (ता.खालापूर, जि.रायगड) या रस्त्याच्या कामासाठी ७ कोटी रुपयांचा निधी खर्च करूनही रस्त्याचे काम अर्धवट स्थितीत असून निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार या रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत व निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

प्रश्नांकित साजगाव आडोशी रस्ता हा जव्हार वाडा भिंवंडी कर्जत हळ महड ताकई आडोशी या रस्त्याचा भाग आहे. सदर रस्त्याची १४३/०० ते १५२/८०० या लांबीपैकी १४६/३०० ते १४७/३०० ही लांबी नगर परिषद खोपोली यांचेकडे देखभाल व दुरुस्तीसाठी आहे.

सदर रस्त्याच्या ९०० मीटर लांबीमध्ये कॉंक्रिट रस्ता अस्तित्वात आहे. तसेच सदर रस्त्याच्या कि.मी.१४८/०० ते १४९/६०० या लांबीच्या भागात दोन कामे मंजूर असून सदरील कामे प्रगतीपथावर आहेत. प्रगतीपथावरील कामे चांगल्या दर्जाची आहेत. तसेच कि.मी.१४९/६०० ते १५२/८०० या लांबीतील रस्ता सुधारणेकरीता प्रशासकीय मंजूरी प्राप्त आहे.

सद्य:स्थितीत सदर काम निविदा निश्चिती स्तरावर आहे. निविदा निश्चिती झाल्यानंतर कार्यारंभ आदेश देऊन काम लवकरात लवकर सुरु करण्याचे नियोजन आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला शहरात महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना प्रभावीपणे राबविण्याबाबत

**(१३) * १४२०६२ श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम)** : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरातील अनेक रुग्णालयांमध्ये गरजू रुग्णांना महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ जाणीवपूर्वक दिला जात नसल्याने रुग्णांचे आर्थिक नुकसान होत असल्यामुळे रुग्णांची दिशाभूल करणाऱ्या रुग्णालयांचे परवाने तातडीने रद्द करण्याची मागणी लोकप्रतिनीधी यांनी माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, त्यानुसार अकोला शहरातील गरजु रुग्णांना महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ मिळण्याबाबत व या प्रकरणातील दोषी रुग्णालयांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.

विरोधी पक्षनेता, अकोला महानगरपालिका, अकोला यांनी जिल्हाधिकारी, अकोला यांना दिनांक १७.०५.२०१९ रोजी महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना अधिक प्रभावीपणे राबविण्याबाबत पत्र लिहिलेले आहे.

(२) या अनुषंगाने दिनांक २०.०५.२०१९ रोजी जिल्हाधिकारी, अकोला यांनी जिल्हा नियंत्रण समितीची बैठक घेतली.

(३) अकोला शहरातील गोरगरीब रुग्णांना शासनाच्या विविध वैद्यकीय योजना व सुविधांचा लाभ मिळण्यासाठी जनजागृती केलेली आहे. तसेच अंगीकृत रुग्णालयात योजनेचा लाभ न मिळाल्यास किंवा काही तक्रारी असल्यास महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत १५५३८८ किंवा १८००२३३२२०० या टोल फ्री क्रमांकावर तसेच प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत १४५५५ किंवा १८००१११५६५ या टोल फ्री क्रमांकावर लाभार्थी कॉल करु शकतो.

अकोला जिल्हयातील रुग्णालयाबाबत माहे मे, २०१९ मध्ये १८ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी ३ तक्रारींचे निवारण करण्यात आले असून उर्वरीत १५ तक्रारींचे निवारण करण्याची प्रक्रिया सुरू आहे. तसेच अकोला जिल्हयातील माहे मे, २०१९ मध्ये ०६ रुग्णालयांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून दिनांक ११.०६.२०१९ पर्यंत १० खाजगी रुग्णालयांचे अंगीकरण रद्द करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रेणापूर (जि.लातूर) तालुक्यातील मांजरा व रेणा नदी पात्रात अवैध वाळू उपसा होत असल्याबाबत

**(१४) * १३९७९३ श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेणापूर (जि.लातूर) तालुक्यातील मांजरा व रेणा नदी पात्रात प्रशासनाच्या सहकार्याने अहोरात्र अवैध वाळू उपसा होत असून यामुळे शासनाच्या महसुलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचे तसेच वाळू उपसामुळे

मांजरा नदीवरील बॅरेजलाही धोका निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून उक्त नदीपात्रात होणारा अवैध वाळू उपसा बंद करण्याबाबत लोकप्रतिनिधी, लातूर ग्रामीण यांनी जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडे दिनांक १४ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अवैध वाळू उपसाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार मांजरा व रेणा नदी पात्रात अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर कारवाई करुन अवैध वाळु उपसा रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) रेणापूर (जि.लातूर) तालुक्यातील मांजरा व रेणा नदी पात्रातून अवैध वाळू उत्खनन व वाहतूकीची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आलेली आहेत. तथापि, त्यात प्रशासनाचा सहभाग असल्याची किंवा त्यामुळे मांजरा नदीवरील बॅराजलाही धोका निर्माण झाल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक प्रतिबंध करण्यासाठी जिल्हा, उपविभागीय व तहसील स्तरावर दक्षता पथके स्थापन करण्यात आली आहेत. सदर पथकांमार्फत रेणापूर तालुक्यात सन २०१८-२०१९ या कालावधीत वाळूचे अवैध वाहतूकीच्या १४ प्रकरणी रु.२१,१५,७७०/- इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली असून ४ प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच रेणापूर तालुक्यात १५८६ ब्रास इतका वाळूसाठा जप्त करुन त्याचा लिलाव करुन लिलावाद्वारे रु.१२,२४,६१०/- इतकी रक्कम शासनजमा करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आयुष्यमान भारत योजनेंतर्गत रुग्णालयांमध्ये करण्यात आलेल्या शस्त्रक्रियांची रक्कम रुग्णालयांना अदा करण्याबाबत

**(१५) * १३९८५८ श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाची आयुष्यमान भारत योजना माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये सुरु झाली असुन सदर योजनेंतर्गत रुग्णांना पाच लाख रुपयांच्या वैद्यकीय खर्चाची शाश्वती केंद्र शासन देणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत मुंबईसह राज्यातील विविध रुग्णालयांमध्ये करण्यात आलेल्या शस्त्रक्रियांची रक्कम रुग्णालयांच्या खाती जमा झाली नसल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(४) असल्यास, त्यानुसार सदरहू योजनेअंतर्गत रुग्णालयांमध्ये करण्यात आलेल्या शस्त्रक्रियांचा परतावा रुग्णालयांना तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.

केंद्र शासनाची आयुष्यमान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना राज्यात दिनांक २३ सप्टेंबर, २०१८ पासून महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेसह राबविण्यात येत आहे. आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेतंर्गत राज्यातील ८३.७२ लक्ष कुटुंबांना प्रति कुटुंब प्रति वर्ष रुपये ५.०० लाखापर्यंतचे उपचार व शस्त्रक्रियांचा खर्च अनुज्ञेय आहे. यामध्ये केंद्र शासनाचा ६० टक्के तर राज्य शासनाचा ४० टक्के आर्थिक हिस्सा आहे.

(२), (३) व (४) राज्यातील ८३.७२ लक्ष लाभार्थ्यांना सध्या विमा कंपनीमार्फत रु.१.५० लक्षपर्यंतचे विमा संरक्षण विमा तत्वावर (Insurance Mode) व रु.१.५० लक्ष ते रु.५.०० लक्ष विमा संरक्षण राज्य आरोग्य हमी सोसायटीमार्फत हमी तत्वावर (Assurance Mode) रुग्णालयांना अदा करण्यात येत आहे.

प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेतंर्गत दिनांक २३ सप्टेंबर, २०१८ ते दिनांक १० जुन, २०१९ पर्यंत एकूण ४,०४,४३३ दावे रुग्णालयाकडुन प्राप्त झाले आहेत. त्यापैकी ३,८७,८२४ दाव्यांची रक्कम रुपये ८१५,१७,७३,४२५/- रुग्णालयांना अदा करण्यात आली असून उर्वरीत दाव्यांची रक्कम अदा करण्याची प्रक्रीया प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हयामध्ये रस्त्यांच्या बाजुला बेकायदेशीररित्या केबल टाकल्याबाबत

**(१६) * १४१९३३ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयामध्ये जीओ कंपनीसह अन्य खाजगी कंपन्या व केंद्रीय बी.एस.एन.एल. कंपनीकडून रस्त्यांच्या बाजुला बेकायदेशीररित्या ओएफसी केबल टाकल्यामुळे रस्त्यांची दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्यांची दुरवस्था झाल्याने प्रवास करताना नागरीकांची गैरसोय होत असून यास जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी जिल्हाधिकारी यांचेकडे दिनांक १६ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व कोल्हापुर जिल्हयात किती किलोमीटर लांबीच्या रस्त्यांवर केबल टाकण्यात आल्या आहेत,

(४) असल्यास, परवानगी न घेता ओएफसी केबल टाकणाऱ्या संबंधित ठेकेदार व इतर संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

रिलायन्स जीओ, भारती एअरटेल या कंपन्यांना नियमानुसार शुल्क घेऊन परवानगी देण्यात आली आहे. महाआयटी कंपनीस शासन निर्णयानुसार निशुल्क मार्ग हक्क देण्यात आला आहे. काही ठिकाणी बाजूपट्टीजवळ केबल टाकल्याने बाजूपट्टी खराब झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) सदर निवेदन अदयाप प्राप्त झालेले नाही. तथापि बाजूपट्टी पूर्ववत करून घेण्याबाबत बी.एस.एन.एल, कोल्हापूर यांना लेखी कळविण्यात आले असून याबाबत निवासी उपजिल्हाधिकारी यांना सूचित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

कोल्हापूर जिल्हयात ६३८.१५० कि.मी. लांबीमध्ये केबल टाकण्याची परवानगी देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

रस्त्याच्या बाजूपट्टीवर केबल टाकल्याचे निदर्शनास आले आहे अशा प्रकरणी संबंधित कंपनीविरुध्द पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. तसेच संबंधित कंपनीकडून नुकसानीपोटी रु. ४६.४० लक्ष इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्हयातील मौजे वावे (ता.खेड) व मौजे आबलोली (ता.गुहागर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांचे ग्रामीण रूग्णालयात श्रेणीवर्धन करण्याबाबत

**(१७) * १३५९६०  श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील मौजे वावे (ता.खेड) व मौजे आबलोली (ता.गुहागर) येथील प्राथमिक आरोग्य केद्रांचे ग्रामीण रूग्णालयात श्रेणीवर्धन करण्याबाबत स्थानिक ग्रामस्थांसह लोकप्रतिनिधी यांनी वारंवार पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रूग्णालयांना दर्जोन्नत करून त्यांना बृहत आराखडयात समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरू असल्याचे शासनाने माहे जुलै-ऑगस्ट, २०१७ मध्ये मान्य केलेले असतानाही प्रत्यक्षात कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मौजे वावे आणि मौजे आबलोली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांचे ग्रामीण रूग्णालयात श्रेणीवर्धन करण्याबाबत व त्यांना बृहत आराखडयात समाविष्ट करण्यात विलंब करणाऱ्या संबंधीत अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) नवीन रुग्णालयांना मान्यता देणे व कार्यान्वीत रुग्णालयांचे श्रेणीवर्धन करणे याबाबत सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित जोड बृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही संचालक, आरोग्य सेवा यांचे स्तरावर सुरु असून येथे मौजे वावे (ता.खेड) आणि मौजे आबलोली (ता.गुहागर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांचे ग्रामीण रूग्णालयात श्रेणीवर्धन करण्याबाबत निकषानुसार जोड बृहत आराखडयामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्हयात कृषी केंद्रातील जैवीक संजीवकांमध्ये किटकनाशकांचे अंश आढळून आल्याबाबत

**(१८) * १३९६१४ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयात कृषी केंद्रातुन पिकांच्या वाढीसाठी विक्री केल्या जाणाऱ्या जैवीक संजीवकांमध्ये किटकनाशकांचे अंश आढळून आल्याचे दिनांक ८ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मे. सेंट्रल बायोटेक कंपनीने विक्री केलेल्या जैवीक संजीवकात रासायनिक घटकांचा वापर नियमबाहय केला असून सदर रासायनिकांचा वापर करताना कृषी आयुक्तालयाची परवानगी घेतली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,
(४) असल्यास, त्यानुसार शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या संबंधित दोषी कंपनीविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अनिल बोंडे :** (१) होय हे खरे आहे.
(२) होय हे खरे आहे.
(३) होय.

उर्वरित अंश किटकनाशक चाचणी प्रयोगशाळा नागपूर व किटकनाशक चाचणी प्रयोगशाळा, अमरावती येथे मे. सेंट्रल बायोटेक, ता.सावनेर, जि.नागपूर यांचे उत्पादित “फलॉमींगो” (Plant Extract ५५% Natural Alkalore ३.५%) या पीक वाढ संजिवकांचा नमुना तपासणीकरीता सादर केला असता, सदर नमुन्यामध्ये “इमिडाक्लोप्रीड” या किटकनाशकाचा अंश आढळून आला आहे.
(४) मे. सेंट्रल बायोटेक, ता.सावनेर, जि.नागपूर व मे. कृषि सेवा केंद्र, परतवाडा, ता. अचलपूर, जि. अमरावती यांनी सदर प्रकरणी किटकनाशक कायदा, १९६८ मधील कलम ३ (K), १३ (१) व कलम २९ चे उल्लंघन केलेले असून शासनाची व शेतकऱ्यांची फसवणूक केली असल्याने त्यांचेविरुध्द पोलिस स्टेशन, परतवाडा, ता.अचलपूर, जि.अमरावती येथे गुन्हा क्र.०१७०/१९ दि. ०६/०५/२०१९ अन्वये पोलिस गुन्हा दाखल करण्यात आलेला असून पुढील कार्यवाही पोलिस यंत्रणेमार्फत सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्हयात कृषी विभागाच्या गुण नियंत्रण पथकाने खते व किटकनाशके जप्त केल्याबाबत

**(१९) * १३८३७६ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयात कृषी विभागाच्या गुण नियंत्रण पथकाने दिनांक १६ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास स्थानिक एम.आय.डी.सी फेज-२ मधील गोदामावर छापा टाकून सुमारे २ कोटी रुपयांची खते व कीटकनाशके जप्त केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुणनियंत्रण पथकाने किटकनाशक व खत नियंत्रण कायद्याचे उल्लंघन केल्या प्रकरणी संबंधित कंपनीविरुद्ध पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मे. सेविया बायोओर्गेनिक ॲन्ड फर्टीलायझर प्रा.लि. कंपनी कर्नाटक राज्यातील बेळगाव जिल्ह्यातील आहे. या कंपनीचा परवाना निलंबित असून कंपनीस विक्री बंदीची सूचना निर्गमित केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार परवाना नसताना किटकनाशकांची विक्री करणाऱ्या संबंधित कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**डॉ. अनिल बोंडे :** (१) होय हे खरे आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) सदर कंपनीस महाराष्ट्रात कराड, जि.सातारा येथे दाणेदार मिश्र खत निर्मितीसाठी देण्यात आलेला परवाना रद्द केला असून कंपनीच्या अकोला येथील गोदामात आढळून आलेली खते व किटकनाशकाच्या विक्रीस विक्री बंद आदेश बजावण्यात आलेले आहेत.

(४) मे. सेविओ बायो ऑरर्गेनिक ॲन्ड फर्टीलायझर प्रा. लि. कंपनीच्या अकोला स्थित गोडावूनची दिनांक १६/०३/२०१९ रोजी जिल्हास्तरीय भरारी पथकाने तपासणी केलेली आहे. तपासणी दरम्यान गोडाऊन मध्ये साठवणूक

केलेले सहा किटकनाशके परवान्यात समाविष्ट नसल्याचे तसेच, विद्राव्य खताच्या बॅग, पॅकेट व किटकनाशके बॉटलवर उत्पादकाचे नाव नमूद नसल्याचे निदर्शनास आले. त्याचप्रमाणे पथकाने घेतलेल्या सहा विद्राव्य खताचे व एक सुक्ष्म मुलद्रव्याच्या नमुन्यांपैकी दोन नमुने प्रयोगशाळेतील तपासणीअंती अप्रमाणित आढळून आले.

त्यामुळे, खत नियंत्रण आदेश, १९८५ आणि किटकनाशक कायदा १९६८ व किटकनाशक नियम, १९७१ तसेच, किटकनाशक आदेश, १९८६, अत्यावश्यक वस्तु अधिनियम, १९५५ मधील कलमांचे उल्लंघन केले असल्यामुळे, सदर गोडावून मधील विद्राव्य खते व सुक्ष्ममुलद्रव्य व किटकनाशक साठयाला विक्री बंदचे आदेश देण्यात आलेले आहेत.

(५) सदर कंपनीने शासनाची व शेतकऱ्यांची फसवणूक करण्याच्या उद्देशाने सदर रासायनिक खते व किटकनाशकांचा साठा करुन विक्री केलेली असल्यामुळे त्यांचेविरुध्द एमआयडीसी, पोलिस स्टेशन, अकोला येथे गुन्हा क्र. ६८/१९, दि. ०१/०४/२०१९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील कार्यवाही पोलिस यंत्रणेमार्फत सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राळेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यात अवैध रेती तस्करी होत असल्याबाबत

**(२०) * १३७४५५ श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राळेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यात १५ रेती घाट असून एकाही रेती घाटाचा लिलाव न झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात रेतीचे अवैध उत्खनन करून तस्करी करण्यात येत असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इतर तालुक्यांत रेती माफियांवर कठोर कारवाई होत असतांना राळेगाव तालुक्यात कारवाई होत नसल्यामुळे रेती माफिया उघडपणे तस्करी करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी तातडीने चौकशी करून राळेगाव तालुक्यात अवैध रेती तस्करी करणाऱ्या संबंधीत रेती माफीयांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) राळेगाव तालुक्यातील वाळूघाट हे वर्धा नदीवर असून ते पूर्णत: पाण्याखाली असल्यामुळे भूजल सर्व्हेक्षण विभागाने लिलाव प्रक्रियेसाठी अयोग्य ठरविले आहेत. त्यामुळे राळेगाव तालुक्यात वाळूघाट लिलाव प्रक्रियेसाठी ठेवण्यात आले नाहीत.

राळेगाव तालुक्यात वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूकीची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आलेली आहेत. तथापि, गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीला प्रतिबंध घालण्यासाठी उपविभाग व तालुका स्तरावर भरारी पथकांची स्थापना करण्यात आली असून सदर पथकांमार्फत राळेगाव तालुक्यात माहे एप्रिल,२०१८ ते मार्च,२०१९ या कालावधीत वाळूच्या अवैध वाहतूकीच्या २० प्रकरणी रु.३०,५६,३२०/- इतकी दंडात्मक वसूली करुन ५ प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहे. तसेच माहे एप्रिल,२०१९ ते मे,२०१९ या कालावधीत वाळूच्या अवैध वाहतूकीच्या ५ प्रकरणी रु.१,७१,०४०/- इतकी दंडात्मक रक्कम वसूल करुन एका प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अचलपूर (जि.अमरावती) नगरपरिषद क्षेत्रात राहणाऱ्या सिंधी नागरिकांची घरे स्थायी करण्याबाबत

**(२१) * १४१९२० श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अचलपूर (जि.अमरावती) नगरपरिषद क्षेत्रात राहणाऱ्या सिंधी नागरिकांची घरे स्थायी करण्यासंदर्भातील प्रस्ताव राज्य शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव तातडीने मंजूर करून सिंधी नागरिकांना अस्थायी स्वरूपात देण्यात आलेले भाडेपट्टे स्थायी करण्यात यावेत अशी मागणी लोकप्रतिनिधींनी प्रधान सचिव, महसूल व वन विभाग यांचेकडे दिनांक ३१ जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करून अचलपूर नगरपरिषद क्षेत्रात राहणाऱ्या सिंधी नागरिकांची घरे स्थायी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय.
(३) व (४) अचलपूर, जि.अमरावती येथील नगरपरिषद क्षेत्रात राहणा-या सिंधी बांधवांना निवासी व वाणिज्यिक प्रयोजनासाठी देण्यात आलेले अस्थायी भाडेपट्टे स्थायी करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून संबंधित विभागांशी विचारविनिमय पुर्ण झाल्यानंतर या प्रकरणी उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

-----------------

## आडूळ (ता.पैठण, जि.औरंगाबाद) मंडळातील शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम मिळण्याबाबत

**(२२) * १३५५७४ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.शामराव उर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आडूळ (ता.पैठण, जि.औरंगाबाद) मंडळातील शेतकऱ्यांनी पंतप्रधान पिक विमा योजनेअंतर्गत खरीप हंगामातील पिकांसह फळबागांचा ऑनलाईन विमा माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान भरला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दुष्काळामुळे पिक विमा परतावा मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी अर्ज केला असता पिक विमा उतरविलेल्या पिकांपैकी बाजरी, मुग, मोसंबी व

डाळींब उत्पादक शेतकऱ्यांना विमा मंजूर होवुनही शेतकऱ्यांच्या खात्यात पिक विम्याची रक्कम जमा झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम तातडीने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अनिल बोंडे :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत पैठण तालुक्यातील आडूळ महसूल मंडळातील बाजरी पीकासाठी ५८१ व मुग पीकासाठी १८७७ असे एकुण २४५८ शेतकऱ्यांनी योजनेत सहभाग घेतलेला होता. सहभागी शेतकर्यांपैकी २४५० शेतकऱ्यांना रु.१८.१४ लाख नुकसान भरपाई विमा कंपनीमार्फत निश्चित करण्यात आली असून नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही सुरु आहे. उर्वरीत ८ लाभार्थी शेतकऱ्यांचे खाते क्रमांक चुकीचे असल्याने नुकसान भरपाई रक्कम वितरीत करणे शक्य झाले नसून, सदर खाते क्रमांक तपासून नुकसान भरपाईची रक्कम वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच पुनर्रचित हवामानावर आधारित फळपीक विमा योजनेंतर्गत पैठण तालुक्यातील आडुळ महसूल मंडळातील ६५४ शेतकऱ्यांनी मोसंबी तर १७७ शेतकऱ्यांनी डाळींब या फळपीकाचा विमा उतरविला असून त्यापैकी ६५४ मोसंबी विमा धारक शेतकऱ्यांपैकी ६२९ तर १७७ डाळींब विमा धारक शेतकऱ्यांपैकी ७२ शेतकऱ्यांना विमा नुकसान भरपाई अदा करण्यात आलेली आहे. उर्वरीत अनुक्रमे २५ व १०५ मोसंबी व डाळींब विमा धारक शेतकऱ्यांच्या पीक विमा पोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या कागदपत्रांमध्ये त्रुटी असल्यामुळे सदर त्रुटींची पूर्तता करण्यात आली असून नुकसान भरपाई शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डहाणू (ता.डहाणू, जि.पालघर) नगरपरिषद हद्दीतील कुष्ठरोग निर्मूलन व पुनर्वसन केंद्र सुरु करण्याबाबत

**(२३) * १३७७१४ श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (ता.डहाणू, जि.पालघर) नगरपरिषद हद्दीत कुष्ठरोग झालेल्या रुग्णांच्या पुनर्वसनासाठी ३० वर्षापूर्वी बांधलेले कुष्ठरोग निर्मूलन व पुनर्वसन केंद्र सध्या बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुष्ठरोग पुनर्वसन केंद्रासाठी डहाणू नगरपरिषद हद्दीत शासनाने २२ एकरचा भूखंड दिला होता मात्र येथील कुष्ठरोगाची वसाहत आणि पुनर्वसन केंद्र बंद करुन त्या जागेवर अतिक्रमण करुन अग्निशमन दलाचे केंद्र स्थापन करण्याकरिता सन २०१० मध्ये वा त्यादरम्यान भूमिपूजन करण्यात आले होते. सद्यस्थितीत या भूखंडावर चिकू संकलन केंद्र सुरु असून त्याशिवाय डहाणू फ्रुट प्रॉडक्ट अँण्ड सेल्स यांनी या जागेत शॉपिंग मॉल, बहुउद्देशीय हॉल बांधण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, पालघर यांना सादर केल्याचे माहितीच्या अधिकारात मिळालेल्या माहिती आधारे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कुष्ठरोग निर्मूलन व पुनर्वसन केंद्राअभावी तसेच शासकीय रुग्णालयातील सोयी सुविधांच्या कमतरतेमुळे पालघर, डहाणू, विक्रमगड, कासा, धुंदलवाडी, वाणगांव येथील कुष्ठरोगी रुग्णांना उपचारासाठी गुजरात किंवा मुंबई येथे जावे लागत असल्यामुळे डहाणू येथील कुष्ठरोग पुनर्वसन केंद्र पुन्हा सुरु करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन बंद केलेले कुष्ठरोग निर्मूलन व पुनर्वसन केंद्र त्याच जागेवर पुन्हा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही

(२) हे खरे नाही.

डहाणू नगरपरिषद हद्दीत शासनाने कुष्ठरोगांच्या पुनर्वसनासाठी २२ एकराचा भूखंड दिलेला नाही. सरावली येथील कुष्ठरोगी पुर्नवसन केंद्र व डहाणू फ्रुट प्रॉडक्ट ॲड सेल्स हे सरावली वेलफेअर लेप्रसी बचत सेंटर या स्वयंसेवी संस्थेच्या स्वत:च्या खाजगी मालकीच्या जागेत सुरु आहे.
शॉपिंग मॉल, बहुउद्देशीय हॉल बांधण्याचा कोणाताही प्रस्ताव जिल्हाधिकारी पालघर यांना सादर करण्यात आलेला नाही.
(३) हे खरे नाही.

पालघर जिल्हयामध्ये सहायक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग) ठाणे/ पालघर तसेच अलर्ट इंडिया व कुष्ठरोग दवाखाना वडोली, तलासरी जि.पालघर या स्वयंसेवी संस्थेमार्फत जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच १२ संदर्भ सेवा केंद्रामार्फत कुष्ठरुग्णांना पुरेशा प्रमाणात निदान, उपचार व इतर सुविधा मिळत असल्यामुळे उपचारासाठी गुजरात किंवा मुंबई येथे जाण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सरावली (ता.जि.पालघर) ग्रामपंचायत हद्दीतील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याबाबत

**(२४) * १३६६१५ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सरावली (ता.जि.पालघर) ग्रामपंचायत हद्दीतील अवधनगर, भय्यापाडा, संजयनगर या भागांतील शासकीय जागेवर भूमाफियांनी हजारो अनधिकृत बांधकामे केली असून सदर बांधकामे निष्कासीत करण्यास टाळाटाळ करणाऱ्या तहसीलदार, पालघर यांच्यावर कारवाई करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सरावली ग्रामपंचायत सदस्य आणि त्यांच्या नातेवाईकांनीही या जागेवर चाळींचे व इमारतीचे अनधिकृतरित्या बांधकाम केले असून तहसीलदारांनी त्यावर कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदरची अनधिकृत बांधकामे निष्कासीत करून या अनधिकृत बांधकामावर कारवाई न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशा स्वरुपाची मागणी प्राप्त झाल्याचे आढळले नाही.

(२), (३) व (४) ग्रामपंचायत, सरावली ता.जि.पालघर येथील अवधनगर, भय्यापाडा, संजयनगर येथील शासकीय जमिनीवर अनधिकृत बांधकामे झाल्याचे आढळून आले आहेत. सदर अनधिकृत बांधकामे साधारणत: १५ ते २० वर्षांपूर्वीची असून त्यामध्ये सरावली येथील काही ग्रामपंचायत सदस्यांनी केलेल्या अनधिकृत बांधकामांचा ही समावेश आहे. उपरोक्त अनधिकृत बांधकाम धारकांविरुध्द महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ५० अन्वये तहसिलदार, पालघर यांनी नोटीसा बजावल्या आहेत.

दरम्यान सर्वांसाठी घरे-२०२२ या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण भागातील शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनासाठी केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याच्या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी शासन निर्णय, ग्रामविकास विभाग, क्रमांक. प्रआयो-२०१७/ प्र.क्र.३४८/योजना-१०,दिनांक १६.०२.२०१८ तसेच शासन परिपत्रक, ग्रामविकास विभाग, क्रमांक- प्रआयो- २०१८/प्र. क्र.२५६ / योजना-१०, दिनांक २०.०८.२०१८ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमीत करण्यात आल्या असून त्यानुषंगाने गुणवत्तेनुसार पुढील कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील प्रादेशिक रुग्णालयातील मनोरुग्णांचे झालेले मृत्यु

**(२५) * १३९२७६ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील प्रादेशिक रुग्णालयात मागील तीन वर्षात ४४ मनोरुग्णांचा मृत्यु झाला असुन १४ मनोरुग्ण कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीमुळे पळुन गेल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयात मनोरुग्णांच्या औषधांवर शासनाने एकूण ८२ लक्ष ७ हजार ९५६ रुपये खर्च केले असुन या मनोरुग्णालयात मनोविकृती मानसशास्त्रज्ञ तसेच वर्ग १ ते वर्ग ४ ची एकूण १३२ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्याचे निष्कर्ष काय आहेत,

(४) असल्यास, त्यानुसार सदरहू रिक्त पदे भरण्यासह संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

४४ मनोरुग्णांचा मृत्यु झाला हे खरे आहे. १० मनोरुग्ण पळून गेलेले आहेत. तथापि कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीमुळे पळुन गेले हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

सदर मनोरुग्णालयात औषधे व प्रयोगशाळा साहित्य करीता सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ साठी अनुक्रमे रुपये १४३८८७८/-, रुपये २३५६८६२/- इतकी रक्कम खर्च करण्यात आली आहे.

मनोरुग्णालयातील गट-अ ची २२ पदे मंजूर असून १३ पदे भरलेली आहेत व ९ पदे रिक्त आहेत. गट-ब ते गट-ड ची ३५२ पदे मंजुर असून २३१ पदे भरलेली आहेत व १२१ पदे रिक्त आहेत.

(३) प्रादेशिक मनोरुग्णालयातील सुरक्षा भिंतीची उंची वाढविण्यात आली असून त्यावर तारेचे कुंपन करण्यात आलेले आहे.मनोरुग्णालयाचे परिसरात २४ तास सुरक्षारक्षकाची ड्युटी लावण्यात आली असून पळून जाण्याची प्रवृत्ती असणाया रुग्णांवर विशेष लक्ष ठेवून त्यांना आकस्मिक विभागात ठेवण्यात येते.तसेच आंतररुग्ण विभागातील प्रत्येक कक्षात सी.सी.टी.व्ही. लावण्यात आलेले आहेत. मनोविकारतज्ञ दररोज दोन वेळा तपासणी करतात व पळून न जाण्याबाबत समुपदेशन करण्यात येते.

(४) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत मनोविकृती तज्ज्ञ गट-अ पदभरतीची कार्यवाही सुरु आहे. तसेच ग़ट-ड पदभरतीबाबत ही कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सार्वजनिक बांधकाम विभाग, मालेगांव (ता.बागलाण, जि.नाशिक) येथे झालेला गैरव्यवहार

**(२६) * १३६१८२ श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभाग, मालेगांव (ता.बागलाण, जि.नाशिक) येथील अधिकाऱ्यांनी वरिष्ठ कार्यालयाच्या परवानगीविना ३ लाख रुपयांच्या आतील कामांची निविदा न काढता व कामे न करता स्वत:च्या अधिकारात देयके काढून कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे लेखी स्वरुपात तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार संबंधित दोषिंविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

(२) होय.

(३) या प्रकरणी अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, नाशिक यांना चौकशी करून चौकशी अहवाल सादर करण्यास निर्देशित केलेले आहे.

(४) व (५) सद्य:स्थितीत चौकशीची कार्यवाही प्रगतीत आहे

-----------------

## चंदगड (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) ग्रामीण रुग्णालयाचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत

**(२७) * १३७०७३ श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील चंदगड ग्रामीण रुग्णालयाचे बांधकाम गत २० वर्षापूर्वी झाले असून सदर इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील बांधकाम अर्धवट स्थितीत असल्याचे व दवाखान्याच्या स्लॅबची गळती सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंदगड हा डोंगराळ व दुर्गम तालुका असून या रुग्णालयामध्ये येणाऱ्या रुग्णांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ होत असल्याने सदर इमारत अपूरी पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या इमारतीची दुरुस्ती व दुसऱ्या मजल्यावरील बांधकाम पूर्ण करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून चंदगड ग्रामीण रुग्णालयाची दुरुस्ती व इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील बांधकाम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय अंशत: खरे आहे.

(२) होय

(३) होय

(४) व (५) चंदगड ग्रामीण रुग्णालयाची वेळोवेळी देखभाल व दुरुस्ती करण्यात आली आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाकडून मान्यता मिळाल्यानंतर दुस-या मजल्याचे बांधकामाबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## भातसा नदीवरील वाळकस पूल (ता.कल्याण, जि.ठाणे) कोसळल्याबाबत

**(२८) * १३६१११ श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भातसा नदीवरील धोकादायक ठरलेला वाळकस पूल (ता.कल्याण, जि.ठाणे) दिनांक २२ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास कोसळल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुल कोसळल्यामुळे बेहेरे, कोशिंबे व वावेघर या गावातील हजारो ग्रामस्थांचा संपर्क तुटला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर पूल तातडीने बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

टिटवाळा (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील भातसा नदीवर असलेला भातसा धरण व्यवस्थापन यांचे अखत्यारीतील वाळकस पुल दि. ११.३.२०१९ रोजी कोसळल्याचे निदर्शनास आले.

(३) व (४) होय.

सदरचा पूल हा भातसा जलव्यवस्थापन यांच्या अखत्यारीत आहे. सदर पुलाच्या पुनर्बांधणीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींच्या विनंतीनुसार सदर पुलाचे काम नाबार्ड-२५ अंतर्गत प्रस्तावित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## पनवेल ते शिळफाटा रस्त्यावर उड्डाणपूल बांधण्याबाबत

**(२९) * १४१७९५ श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईतील तळोजा फेज-१ ते खारघर येथून जाणाऱ्या पनवेल ते शिळफाटा रस्त्यावर मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्यामुळे या रस्त्यावर उड्डाणपूल बांधण्याबाबतची मागणी स्थानिक नागरिकांनी वारंवार प्रशासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार या मार्गावरील वाहतुकीची समस्या दूर करण्याकरिता उड्डाणपूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) प्रश्नाधीन लांबीतील साखळी क्र.११५/८०० किमी ते १३१/२०० किमी (कळंबोली ते शिळफाटा) या राष्ट्रीय महामार्ग क्र.४८ च्या भागामधील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी स्टीलयार्ड येथील उडडाणपूलाचे काम पूर्ण करण्यात आले असून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा नावडे फाटा उडडाणपुलाचे व सिडको आरओबीचे काम प्रगतीत आहे.

-----------------

## धारावी (मुंबई) काळा किल्ला आगार येथील पोलीस वसाहतीची दुरुस्ती करण्याबाबत

**(३०) * १३५२३७ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारावी (मुंबई) काळा किल्ला आगार येथील पोलीस वसाहतीतील इमारतीच्या भिंतींना तडे गेले असून २७ वर्षे जुनी असलेल्या या इमारतीची एकदाही दुरुस्ती करण्यात आली नसल्याने इमारतीची दुरवस्था होऊन तेथे राहणारे पोलीस तसेच त्यांच्या कुटुंबियाच्या जिवाला धोका निर्माण झाला असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील इमारतीच्या देखभाल व दुरुस्तीकरिता १ कोटी ६२ लाख रुपयांचा निधी मंजूर होऊनही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे बांधकामे अपूर्ण आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार या पोलीस वसाहतीची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सदर इमारतीच्या दुरुस्तीकरीता १ कोटी ६६ लक्ष इतका निधी गृह विभागाकडून सार्वजनिक बांधकाम विभागास प्राप्त झालेला आहे. त्यानुषंगाने सदर इमारतीचे संरचनात्मक दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्ह्यातील तोंडखुरी-पायखुरी रोगाच्या प्रादुर्भावाबाबत

**(३१) * १३५६२१ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यात तोंडखुरी-पायखुरी रोगाच्या प्रादुर्भावामुळे १० लाख जनावरांचे आरोग्य धोक्यात आल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुलढाणा जिल्ह्यातील पशुसंवर्धन विभागाकडे उपरोक्त रोगाचे निदान व उपचारासाठी आवश्यक औषधे उपलब्ध नसल्याने पशुधन मालकांना सदर औषधे बाहेरून विकत आणावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार बुलढाणा जिल्ह्यातील तोंडखुरी-पायखुरी रोगाने बाधित जनावरांचे तातडीने उपचार करण्यासाठी आवश्यक औषधे उपलब्ध करून देण्याबाबत व या रोगाचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंबरनाथ (जि.ठाणे) येथील विम्को कंपनीस शासनामार्फत दिलेल्या जमिनीबाबत

**(३२) * १३९१८८ डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील विम्को कंपनीस शासनामार्फत देण्यात आलेल्या जमिनीचे शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय आय.टी.सी.लिमिटेड व मातोश्री डेव्हलपर्स यांना हस्तांतरण केल्याने विम्को कंपनीने शर्तभंग करुन

शासनाचा महसूल बुडविल्याप्रकरणी संबधितावर कारवाई करण्यात यावी असे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ११ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास महसूल प्रशासनास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमीन हस्तांतरणामुळे शासनाचा महसूल बुडाला असल्याने याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे लेखी तक्रार केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने अद्यापपर्यंत सदर जमीन विकणाऱ्या व विकत घेणाऱ्या विरोधात कोणतीही कारवाई करण्यात आली नसुन अद्यापि कारवाई न करण्याची कारणे काय आहे,

(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन संबंधीत दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व या प्रकरणाची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशा आशयाचे स्थानिक लोकप्रतिनिधींचे दि.११/१२/२०१८ रोजीचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.

(२), (३), (४) व (५) मौजे कोहोज-खुंटवली, ता.अंबरनाथ, जि.ठाणे येथील विम्को कंपनीकडून आय.टी.सी. कंपनी यांचेकडे विनापरवाना हस्तांतरीत झालेल्या एकूण क्षेत्र ७२८९५.१० चौ.मी. क्षेत्राबाबत मूळ विक्रीच्या किंमतीच्या ७५% अनर्जित रक्कम रु.४१,००,३४,९३८/- इतकी रक्कम संबंधितांकडून वसूल करण्याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांनी कळविल्यानुसार तहसिलदार, अंबरनाथ यांनी मागणी नोटीस पारित केलेली आहे.

सदर मागणी नोटीस बाबत आय.टी.सी. कंपनी यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पीटीशन क्र.८८५८/२०१६ दाखल केली होती. सदर दाव्यामध्ये मा.उच्च न्यायालयाने विभागीय आयुक्त, कोकण यांच्याकडे सुनावणी घेण्याबाबत दिनांक २३/०४/२०१६ रोजी आदेश दिले आहेत. त्यानुषंगाने विभागीय आयुक्त, कोकण यांनी दिनांक १३/११/२०१७ च्या आदेशान्वये आय.टी.सी. कंपनीचे अपिल फेटाळले. सदर आदेशाविरुध्द आय. टी.सी. कंपनीने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.१४१२३/२०१७

दाखल केली होती. सदर याचिकेत मा. उच्च न्यायालयाने दि.२२/१२/२०१७ रोजी आदेश पारित केल्यानुसार मा.मंत्री (महसूल) यांच्याकडे सुनावणी सुरु आहे.

तसेच, विम्को कंपनीकडून मे.मातोश्री शेल्टर्स इंडीया लि. यांच्याकडे विनापरवाना हस्तांतरीत झालेले एकूण क्षेत्र २२००९ चौ.मी. ही जमीन उप विभागीय अधिकारी, उल्हासनगर यांच्याकडील दि.१६/०३/२०१६ च्या आदेशान्वये शासन जमा करणेत आली असून सदर मिळकतीबाबत सद्यस्थितीत मा.मंत्री (महसूल) यांच्याकडे सुनावणी सुरु आहे.

-----------------

## कोमलवाडी (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील जनावरांना झालेली विषबाधा

**(३३) * १४१७१२ श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.संजय कदम (दापोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोमलवाडी (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथे ज्वारीच्या पुन्हा उगवलेल्या खोडव्याचा कोवळा चारा खाल्ल्याने विषबाधा होवून १४ गायी आणि ३ म्हशी अशा एकुण १७ जनावरांचा मृत्यू झाल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार मृत जनावरांच्या मालकांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) हे खरे आहे.
(२) होय.
(३) व (४) विषबाधा होवून जनावरे मृत्युमुखी पडणे ही बाब नैसर्गिक आपत्तीत मोडत नसल्याने, मृत जनावरांच्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देय होत नाही.

-----------------

## मे.रोमा बिल्डर्स प्रा.लि. (जि.ठाणे) यांना जमिनींची विक्री व वापरात बदल करण्यासाठी दिलेल्या परवानगीबाबत

**(३४) * १४१२५६ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भूसंपादन कायदा, १८९४ च्या भाग ७ अंतर्गत औद्योगिक प्रयोजनार्थ कंपन्यांसाठी संपादीत केलेल्या जमिनींची विक्री व वापरात बदल करण्यासाठी शासन निर्णय क्र.संकिर्ण-०१/२०१७/प.क्र.११/अ-२, कपदंदा दिनांक ११ जानेवारी, २०१८ अन्वये शासनाने किती व कोणत्या प्रकल्पाच्या प्रस्तावांना मंजूरी दिली तसेच मंजूरी देतांना भूसंपादन कायदा (कंपन्यांसाठी) १९६३ नियम ८ अन्वये कार्यवाही करण्यात आली आहे काय,
(२) असल्यास, ठाणे नागरी समूहातील मे.रोमा बिल्डर्स प्रा.लि.यांना जिल्हाधिकारी, ठाणे यांनी जमिनींची विक्री व वापरात बदल करण्याबाबत परवानगी दिनांक ११ जानेवारी, २०१८ च्या शासन निर्णयापूर्वी दिली असल्याने ती बेकायदेशीर आहे तसेच याप्रकारे किती कंपन्यांना ठाणे जिल्हाधिका-यांनी दिनांक ११ जानेवारी, २०१८ च्या शासन निर्णयापूर्वी परवानग्या दिल्या आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार मे.रोमा बिल्डर्स प्रा.लि.यांना जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिलेली परवानगी रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) शासन निर्णय क्र.संकिर्ण-०१/२०१७/प्र.क्र.११/अ-२, दि.११.०१.२०१८ अन्वये शासनाने पुढील ५ प्रकरणात परवानगी देण्यात आली आहे.

तपशील पुढीलप्रमाणे :-

i) एस. के. एफ. इंडिया लि. पुणे

ii) मे.ओरियंटल इंडस्ट्रिज, ठाणे

iii) मे. लार्सन ॲण्ड टुब्रो लिमिटेड, मुंबई उपनगर

iv) मे.ग्लॅक्सोस्मिथक्लाईन फार्मास्युटीकल लि., ठाणे

v) मे.जे.के.इनव्हेस्टो ट्रेड (इंडिया) लि., ठाणे

(२) जिल्हाधिकारी, ठाणे यांनी ठाणे नागरी समूहातील मे.रोमा बिल्डर्स प्रा.लि. यांना जमिनीची विक्री व वापरात बदल करण्याबाबत परवानगी दि.११.०१.२०१८ च्या शासन निर्णयापूर्वी दिली असली तरी ती बेकायदेशीर नसून तत्कालीन मा. मंत्री (महसूल) यांनी अर्ध-न्यायिक प्रकरणी दिलेल्या आदेशान्वये परवानगी देण्यात आली आहे.

तसेच दि.११.०१.२०१८ चे शासन धोरण निश्चित होणेपूर्वी शासन मान्यतेनुसार ६ प्रकरणी जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडून परवानगी देण्यात आली आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## पुणे येथील जहांगीर रुग्णालयामध्ये रुग्णांना देण्यात आलेल्या सूपमध्ये रक्त असलेले कापसाचे बोळे आढळून आल्याबाबत

**(३५) * १३६७२२ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील जहांगीर रुग्णालयामध्ये रुग्णांना देण्यात आलेल्या सूपमध्ये रक्त असलेले कापसाचे बोळे आढळून आल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू घडलेल्या घटनेमुळे जहांगीर रुग्णालय रुग्णांच्या आरोग्याबाबत असंवेदनशील असल्याचे रुग्णालय प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आले असून या घटनेचे मोबाईलवर चित्रीकरण करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषगांने संबंधित दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही. तथापि,

अशा आशयाची तक्रार दिनांक ०३/०५/२०१९ रोजीच्या पत्रान्वये अन्न व औषध प्रशासनाच्या पुणे कार्यालयासकेलेलीआहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

तक्रारदाराने सदर बाब रुग्णालय प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली आहे. मात्र सदर घटनेचे चित्रीकरण केल्याचे अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आले नाही. तसेच तक्रारदाराने सदर घटनेचे चित्रीकरण केल्याबाबत तक्रारीत उल्लेख केलेला नाही.

(३) व (४) सदर प्रकरणी अन्न व औषध प्रशासनामार्फत चौकशी करण्यात आली असून तक्रारदाराने केलेल्या तक्रारीच्या अनुषंगेजहागीर रुग्णालयाच्या उपहारगृहाची तपासणी केली असता तपासणीत काही अंशी अस्वच्छता आढळून आली आहे.

सदर तपासणीत आढळून आलेल्या अन्नसुरक्षा व मानदे कायद्यातील तरतुदीच्यात्रुटी/उल्लंघनाच्या अनुषंगाने न्याय निर्णयासाठी खटला दाखल करून रुपये १ लाख इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा ठोठविण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील रुग्णालयांना शस्त्रक्रियेसाठी लागणारे साहित्य पुरविणेबाबत

**(३६) * १३४९२७ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.संजय सावकारे (भुसावळ), प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आरोग्य विभागाच्या जिल्हा रुग्णालय व वैद्यकिय शिक्षण व संशोधन विभागाच्या अंतर्गत वैद्यकिय महाविद्यालयांशी संलग्न रुग्णालयांमध्ये शस्त्रक्रियेसाठी वेगवेगळ्या ११६ प्रकारच्या साहित्यांचा पुरवठा आवश्यक असतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शस्त्रक्रियेसाठी वेगवेगळ्या ११६ प्रकारच्या साहित्यांचा पुरवठा आवश्यक असताना त्यापैकी फक्त २२ साहित्यांचा पुरवठा झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील बहुतांश रुग्णालयात शस्त्रक्रियेसाठी लागणारी सुई, दोरा, हॅण्डग्लोव्ज, बँडेज, प्लास्टर मटेरीयल इत्यादी साहित्याचा अभाव असल्यामुळे शस्त्रक्रिया प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार राज्यातील रुग्णालयांना शस्त्रक्रियेसाठी लागणारे साहित्य त्वरीत पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

हाफकीन बायो-फार्मास्युटीकल्स कॉर्पो. लि. यांचेमार्फत १०९ तदअनुषंगिक उपभोग्य वस्तू व ११४ सर्जिकल साहित्यांचे पुरवठा आदेश देण्यात आले असून त्यापैकी ७० ते ८० टक्के बाबींचा पुरवठा झालेला आहे.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## काळूस (ता.खेड, जि.पुणे) गावठाणातुन जाणाऱ्या गॅस पाईपलाईनबाबत

**(३७) * १४२३७२ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) काळूस (ता.खेड, जि.पुणे) गावातून जाणाऱ्या गॅस वाहिनीसाठी गावठाण ते माळवाडी दरम्यान होत असलेले खोदकाम पाच फुट खोल करणे आवश्यक असताना दोन ते तीन फुट खोल करण्यात येत असून या खोदकामामुळे नादुरुस्त झालेल्या रस्त्याची दुरुस्तीही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरची गॅस वाहिनी लोकवस्तीतून जात असुन सुरक्षिततेच्या दृष्टीने धोकादायक असल्याने गावाबाहेरून पाईपलाईन नेण्याच्या मागणीसाठी काळूस गावातील ग्रामस्थांनी माहे जानेवारी, २०१९ मध्ये याबाबत तहसीलदार, खेड यांना लेखी निवेदन देऊन चक्री उपोषण सुरु केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार काळूस गावातून जाणारी पाईपलाईन गावाबाहेरून नेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) सदर गॅस पाईपलाईन माळवाडी ते काळूस गावठाणातून खोदून रस्त्यालगत जागेतून तसेच काही खाजगी मालकी वहिवाटीच्या जमिनीतून नेण्यात आलेली आहे. काळूस गावठाणामध्ये अंदाजे २०० मीटर जागेमधून सदर पाईपलाईन नेण्यात येत असून ती नेण्यात येऊ नये याकरिता ग्रामस्थांनी चक्री उपोषण सुरू करून तहसीलदार, खेड यांना लेखी निवेदन दिलेले आहे.

तथापि उपोषणाच्या ठिकाणी एचपीसीएल कंपनीचे अधिकारी व तहसीलदार, खेड यांनी समक्ष भेट देऊन ग्रामस्थांच्या शंकांचे निरसन केले आहे. त्याचप्रमाणे दिनांक १७.१.२०१९ रोजी उपविभागीय अधिकारी, मावळ-मुळशी तथा सक्षम प्राधिकारी, उरण-चाकण-शिक्रापूर गॅस पाईपलाईन प्रकल्प यांच्या उपस्थितीमध्ये काळूस गावी ग्रामस्थांची बैठक घेऊन त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करून ग्रामस्थांच्या शंकांचे निरसन केले आहे. तसेच दिनांक १.६.२०१९ रोजी उपविभागीय अधिकारी, मावळ-मुळशी तथा सक्षम प्राधिकारी, उरण-चाकण-शिक्रापूर गॅस पाईपलाईन प्रकल्प तसेच उपविभागीय अधिकारी, खेड यांनी मा. आमदार महोदय व काळूस येथील ग्रामस्थ यांच्या उपस्थितीमध्ये उपविभागीय अधिकारी, खेड यांच्या कार्यालयात बैठक घेऊन सविस्तर चर्चा करून ग्रामस्थांच्या शंकांचे निरसन केले आहे. तसेच पोलीस बंदोबस्तामध्ये सदर पाईपलाईनचे काम सुरू आहे. पाईपलाईनचे काम पूर्ण होताच रस्ते पूर्ववत करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील चांदा येथील जनावरांचे लसीकरण करुन तेलकुडगाव येथील घटसर्प व लाळया खुरकुत रोगाचा प्रादर्भाव कमी करण्याबाबत

**(३८) * १४०४८२ श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदा (ता.नेवासा, जि.अहमदनगर) येथे कायमस्वरूपी पशु वैद्यकीय अधिकारी नसून पशुसंवर्धन विभागाकडून लसीकरण होत नसल्यामुळे जनावरांवर उपचार करण्यासाठी अडचणी निर्माण होत असून यासाठी नेवासा पंचायत समितीचे पशुवैद्यकीय अधिकारी जबाबदार असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नेवासा तालुक्यातील कौठा येथे पिसाळलेल्या कुत्र्याने चावा घेतलेल्या जनावरांना पशुसंवर्धन विभागाकडे लस मिळाली नसल्याने शेतकऱ्यांना स्वतः खर्च करून लस विकत घ्यावी लागली असून त्याचा खर्चही देण्यास सबंधिताकडून विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तेलकुडगाव (ता.नेवासा) येथे घटसर्प व लाळया खुरकूत रोगाच्या प्रादुर्भावाने अनेक दुभती जनावरे मृत झाली असून लाळया खुरकुत रोगाचे लसीकरण केले असतानाही त्याचा फायदा होत नाही आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन यासर्व प्रकरणी उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) चांदा (ता.नेवासा, जि.अहमदनगर) येथे श्रेणी-२ चा पशुवैद्यकीय दवाखाना असुन, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी हे पद मंजूर आहे. सदरचे पद दि.०१/०१/२०१९ पासुन बदलीने रिक्त झालेले आहे. या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री.पालवे एन.एन., सहाय्यक पशुधन विकास अधिकारी, पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२, घोडेगाव, ता.नेवासा यांचेकडे देण्यात आलेला आहे. संबंधीतांनी पशुवैद्यकीय दवाखाना चांदा,

अंतर्गत सर्व गावांमध्ये पीपीआर ५,५०० तसेच, लाळ खुरकुत ६,५०० लसमात्रा पशुधनास टोचलेल्या आहेत. तसेच, अतिरिक्त कार्यभार संभाळुन परिसरातील जनावरांवर वेळोवेळी उपचार केलेला असल्यामुळे पशुसंवर्धन विभागाकडुन लसीकरण व उपचार होत नव्हते हे खरे नाही. तसेच, नेवासा पंचायत समितीचे पशुवैद्यकिय अधिकारी यास जबाबदार असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केल्याचे खरे नाही.

(२) हे खरे नसुन पिसाळलेल्या कुत्र्याने चावा घेतलेल्या जनावरांना लस टोचण्यासाठी जिल्हा परिषद सेस अंतर्गत गट विकास अधिकारी यांना निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. व त्यामधुन कौठा ता. नेवासा येथे लाभार्थीचे देयके दि. ३०/०३/२०१९ रोजी काढण्यात आलेली आहेत. कौठा ता. नेवासा येथील एका शेतकऱ्याच्या जनावराला श्वानदंश प्रतिबंधक लस टोचण्याचा खर्च डीबीटी व्दारे संबंधित शेतकऱ्याच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात आलेला आहे.

(३) हे खरे नसुन तेलकुडगाव (ता. नेवासा) येथे एकुण २,९७१ इतके पशुधन आहे. तेथे माहे नोव्हेंबर, २०१८ दरम्यान रोगाची लागण झाली होती. यामुळे एकुण ३९० जनावरे आजारी पडली होती. पशुसंवर्धन विभागामार्फत तात्काळ पशुवैद्यकिय अधिकाऱ्यांचे पथक तयार करुन तेलकुडगाव व परिसरात आजारी जनावरांवर उपचार व लसीकरण करण्यात आलेले आहे. तसेच, रोगनिदानासाठी विभागीय रोग अन्वेषण प्रयोगशाळा, नाशिक यांच्या पथकाने भेट दिलेली आहे. रोग अन्वेषण विभाग, पुणे यांचे पत्र दि.५/१२/२०१८ अन्वये, तेलकुडगाव परीसरात पशुधनास घटसर्प रोगाची लागण झाल्याचे कळविलेले आहे. सदर नमुने हे लाळया खुरकुत रोगासाठी नकारार्थी आढळुन आलेले आहेत. उपचारानंतर ३६० जनावरे आजारातुन बरी झालेली आहेत. दरम्यान ७ वासरे, १० गाई, ३ म्हशी, १० शेळया व करडे अशी एकुण ३० जनावरे मृत्यू पावलेली आहेत. तसेच, तेलकुडगाव परिसरात लाळ खुरकुत २,२७९ व घटसर्प ३,४०० लसमात्रा पशुधनास टोचण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत एकही जनावर आजारी नाही. पशुधनास लसीकरण केलेले असताना त्याचा फायदा होत नाही हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौ.पाडळी, हातनूर (ता.तासगांव, जि.सांगली) परिसरातील शेतक-यांच्या सातबा-यावरील टेंभू योजनेचा स्लॅब रद्द करण्याबाबत

**(३९) * १४२४७१ श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.पाडळी, हातनूर (ता.तासगांव, जि.सांगली) परिसरातील शेतकऱ्यांच्या सातबा-यावरील टेंभू योजनेचा स्लॅब रद्द करण्याबाबत दिनांक २८ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास मा.महसूल मंत्री यांच्या कार्यालयामध्ये बैठक घेण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावासंदर्भात एसआरक्र.४६२ ची कलम ४ची अधीसूचना माहे ऑक्टोबर, १९९९ मध्ये काढल्यानंतर सदर प्रकरणी कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यामुळे टेंभू प्रकल्पासाठी अतिरिक्त शेरे टाकल्याने शेतक-यांना अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने सदरचे शेरे काढून टाकण्याबाबत शेतकऱ्यांसह लोकप्रतिनिधींनी मा.महसूल मंत्री, विभागीय आयुक्त, पुणे तसेच जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे दिनांक २४ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(४) असल्यास, त्यानुसार मौ.पाडळी, हातनूर परिसरातील शेतक-यांच्या सातबाऱ्यावरील टेंभू योजनेचा स्लॅब काढून टाकण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) नाही.

(२) होय.

(३) व (४) यासंदर्भात यापूर्वीच विभागीय आयुक्त पुणे यांचेकडून स्पयंस्पष्ट अहवाल मागविण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्हयातील लाभार्थ्यांना राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत ट्रॅक्टरचे अनुदान देण्याबाबत

**(४०) * १३८७१० श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.राजेश काशीवार (साकोली), डॉ.देवराव होळी (गडचिरोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयात सन २०१७-१८ मध्ये राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत कृषी विभागामार्फत अनुदानावर ट्रॅक्टरचे वाटप करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाटप करण्यात आलेल्या ट्रॅक्टरची शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानाची रक्कम लाभार्थ्यांना अदयापही पूर्णपणे वाटप करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी सदर प्रकरणाची चौकशी करण्यात यावी याकरीता दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास शासनाला निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अनिल बोंडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) याबाबत विभागीय कृषि सह संचालक, नागपूर यांचे स्तरावरुन तपासणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून ज्या अल्प/अत्यल्प भूधारक शेतक-यांना नजर चुकीने रु.१.२५ लाख ऐवजी रु.१.०० लाख अनुदान अदा करण्यात आलेले आहे. अशा पात्र शेतक-यांना रु.०.२५ लाख प्रमाणे उर्वरित अनुदान अदा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद व जालना जिल्हयात रस्त्यावरील खड्डे बुजविण्याच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(४१) * १४११०२ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद व जालना जिल्हयात सन २००९ ते २०१४ या कालावधीत रस्त्यावरील खड्डे बुजविण्याची कामे न करता ६० कोटी रुपयांची देयके सार्वजनिक बांधकाम विभागाने अदा केल्याचे चौकशी समितीच्या अहवालातून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अहवालातील निष्कर्षाच्या आधारे या प्रकरणातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) अनियमितेस जबाबदार असणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येत आहे. त्यानुषंगाने विभागीय चौकशीची प्रक्रीया प्रगतीत आहे.

-----------------

## अहमदनगर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या (ता.जि.अहमदनगर) परिसरात मुदतबाहय औषधे व किटकनाशकांची होती असलेली विक्री

**(४२) * १४२३३३ श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या (ता.जि.अहमदनगर) परिसरात मुदतबाहय औषधे व किटकनाशकांची बनावट लेबल लावुन पृथ्वी ॲग्रो सर्व्हिसेस या कंपनीकडून विक्री करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पृथ्वी ॲग्रो सर्व्हिसेस या कंपनीचा परवाना रद्द करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी राहुरीचे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.कृषी मंत्री, जिल्हाधिकारी, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण अधिकारी, कृषी विभाग, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, अहमदनगर यांच्याकडे दिनांक २० मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(४) असल्यास, चौकशीनुसार पृथ्वी ॲग्रो सर्व्हिसेस या कंपनीविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अनिल बोंडे :** (१) हे खरे आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) अहमदनगर जिल्हयामध्ये दिनांक १६ मे, २०१९ रोजी मे. पृथ्वी ॲग्रो सर्व्हिसेस, मार्केट यार्ड, अहमदनगर या किटकनाशक विक्रेत्याच्या गोदामाची तपासणी पथकाने, तपासणी केली असता गोदामामध्ये मुदतबाहय किटकनाशकांचा साठा आढळून आलेला आहे. किटकनाशकांच्या वेष्टनावर फेरफार करण्यात आलेला साठादेखील आढळून आलेला आहे. तसेच, साठापुस्तके अद्ययावत नसलेबाबत आढळून आलेले आहे.

(४) मे. पृथ्वी ॲग्रो सर्व्हिसेस यांचे प्लॉट क्र. १३, मार्केट यार्ड, अहमदनगर येथील अनधिकृत गोदामामध्ये आढळून आलेल्या लेबलमध्ये फेरफार करण्यात आलेल्या एकूण रक्कम रु. १.०४ लाख च्या किटकनाशकाच्या साठयास जप्ती आदेश देण्यात आले. तसेच, मुदतबाहय किटकनाशकांच्या रु. १७.८४ लाख रकमेच्या च्या साठयास देखील जप्ती आदेश देण्यात आले आहेत.

जप्त किटकनाशकांचे साठयास मा. न्यायालयाकडून कस्टडी घेणेकरीता मा. न्यायालयात किरकोळ अर्ज क्र. ४८१ दि. २१/०५/२०१९ दाखल करण्यात आलेला आहे. अनधिकृत जागेमध्ये साठवणूक केल्यामुळे व साठा पुस्तके अद्ययावत नसल्यामुळे एकूण रु. ४४३.३३ लाख किंमतीची किटकनाशके

विक्रीबंद करणेत आलेली आहेत. तसेच, दिनांक २२/०५/२०१९ रोजी कोतवाली पोलीस स्टेशन, अहमदनगर येथे एफआयआर दाखल करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे, मे. पृथ्वी ॲग्रो सर्व्हिसेस विक्रेत्याचा विक्री परवाना दिनांक १२/०६/२०१९ अन्वये रद्द करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील केव-म्हसरोली येथील दगडी पुलाच्या बांधकामाबाबत

**(४३) * १४१८१० श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील केव-म्हसरोली येथील जीर्ण झालेल्या दगडी पुलाचे काम निधीअभावी रखडले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पुलाची पाहणी शासनाने केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार या पुलाच्या दुरुस्तीसाठी तातडीने निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) जिल्हा परिषदेमार्फत सदर पुलाची पाहणी करण्यात आली आहे.

(३) व (४) प्रजिमा ४४ ते चाबके तलावली घाणेघर घाणेडा बोरांडा शिळशेत केव म्हसरोळी कुंर्झे कढीपाडा या इतर जिल्हा मार्ग क्र. ७७ च्या सा.क्र. १९/४८० वर प्रश्नांकित दगडी पुल आहे. सदर पुलाची दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

प्रश्नांकित पुलाच्या दुरुस्तीचे काम सन २०१९-२० मध्ये ५०५४ इतर जिल्हा मार्ग अंतर्गत प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

-----------------

## नांदूरखंदरमाळ (ता.संगमनेर, जि.अहमदनगर) येथील मुळा धरणासाठी संपादीत केलेली जमीन वगळणेबाबत

**(४४) * १४०३९८ श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदूरखंदरमाळ (ता.संगमनेर, जि.अहमदनगर) येथील मुळा धरणासाठी संपादीत केलेल्या जमिनीचा वापर न झाल्याने सदरहू जमीन वगळणेबाबतचा आदेश मा.महसूल मंत्री यांच्या न्यायालयाने दिनांक २८ ऑगस्ट, २०१४ रोजी वा त्यासुमारास दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी विभागीय आयुक्त, नाशिक यांनी अद्यापि अधिसूचना काढली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार मुळा धरणासाठी विनावापर संपादीत केलेली जमीन वगळणेबाबत व विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३), (४) व (५) तत्कालीन मा.मंत्री (महसूल) यांच्या दिनांक २८.८.२०१४ रोजीच्या आदेशाचे शासन स्तरावर पुनर्विलोकन करण्याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांच्याकडून प्राप्त झाला असून सदर प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

-----------------

## औरंगाबाद-जळगाव राष्ट्रीय महामार्गावरील सिल्लोड-अजिंठा या टप्प्यातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(४५) * १४२२१२ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद-जळगाव या राष्ट्रीय महामार्गावरील सिल्लोड-अजिंठा या टप्प्यातील रस्त्याचे काम कंत्राटदाराने बंद केल्यामुळे रस्त्याची दुरवस्था होऊन रस्त्यावरुन प्रवास करणे गैरसोयीचे झाल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार या रस्त्याचे बंद पडलेले काम सुरु करून तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) औरंगाबाद - जळगाव या राष्ट्रीय महामार्ग क्र.७५३F मधील सिल्लोड-अजिंठा या टप्प्यातील सुमारे ३९ कि.मी. रस्त्याच्या दुपदरीकरणाची पुनर्बांधणी करण्याचे काम करण्याकरिता दि.१२.०६.२०१७ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले होते. त्यानुसार संबंधित कंत्राटदाराकडून काम सुरु होऊन सुमारे १५.३० कि.मी. लांबीमध्ये Subgrade चे काम व सुमारे ५ कि.मी.लांबीमध्ये GSB चे काम करण्यात आले. त्यानंतर या ठिकाणी काँक्रिटचे दोन्ही थराचे काम करण्याआधी तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींकडून विषयांकित ठिकाणी दुपदरीकरणाऐवजी चौपदरीकरण करण्याबाबत सूचना प्राप्त झाल्या. त्यामुळे सदर काम दि.२०.०३.२०१९ पासून स्थगित ठेवण्यात येऊन या ठिकाणच्या चौपदरीकरणाचा प्रस्ताव दि. १४.०५.२०१९ अन्वये केंद्र शासनाच्या मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे. त्यानुसार मंजुरी प्राप्त होताच पुढील काम सुरु करण्यात येईल.

तथापि सदयस्थितीत सदर काम बंद पडल्यामुळे रस्ता वाहतुकीस सुरळीत ठेवण्याच्या दृष्टिने अनुषंगिक आवश्यक दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बोराळा व तामसाठा (जि.वाशिम) येथील शेतकऱ्यांना भुसंपादनाचा मोबदला देण्याबाबत

**(४६) * १४२४३३ श्री.अमित झनक (रिसोड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोराळा व तामसाठा (जि.वाशिम) येथील शेतकऱ्यांच्या जमिनी अकोला-नांदेड राज्यमार्गासाठी शासनाने संपादीत केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमिनी संपादीत करून दोन महिन्यांचा कालावधी झाला असतानाही शेतकऱ्यांना त्यांच्या संपादीत केलेल्या जमिनीचा मोबदला मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करुन येथील शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला तातडीने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हो खरे आहे.

(२) सदर दोन्ही गावामध्ये दिनांक २६/१२/२०१८ रोजी निवाडा पारीत झाला आहे.

भु.सं.प्र.क्र.NH-१६१-३८/४७/२०१६-२०१७ मौजे बोराळा येथील एकूण ३७ कास्तकारांपैकी २५ कास्तकारांना रू.१०,३९,३२,७४१/- व भु.सं.प्र.क्र.NH-१६१-३७/४७/२०१६-२०१७ मौजे तामसाळा येथील एकुण २८ कास्तकारांपैकी १८ कास्तकारांना रू.११,०७,०१,०७२/- मोबदला वाटप करण्यात आलेला आहे.

उर्वरित वाटपाची कार्यवाही सुरू आहे.

(३) उर्वरित कास्तकाराचे मोबदला वाटपाची कार्यवाही सुरू आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## सांगोले (जि.सोलापूर) तालुक्यातील शेतकऱ्यांना खरीप व रब्बी हंगामातील पिकांच्या नुकसानाची भरपाई देण्याबाबत

**(४७) * १४२२४४ श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगोले (जि.सोलापूर) तालुक्यामध्ये सन २००१८-१९ मध्ये खरीप हंगामात सुमारे १३९८ शेतकऱ्यांनी ११५३ हेक्टर क्षेत्रावरील विमा उतरविला असून एकूण ४.३५ लाख रूपयांची रक्कम विमा कंपनीकडे जमा केली असुन रब्बी हंगामात सुमारे ३५६६९ शेतकऱ्यांनी २८०७० हेक्टर क्षेत्रासाठी एकूण १२.६८ लाख रूपयांची रक्कम विमा कंपनीकडे भरली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१८ मध्ये मृग बहार डाळिंबासाठी सुमारे ९८२७ शेतकऱ्यांनी ५९६९ हेक्टर क्षेत्रासाठी एकूण ३.६१ कोटी १४ हजार रूपयांचा विमा हप्ता जमा केला असुन आंबिया बहार डाळिंबासाठी सुमारे ६३५४ शेतकऱ्यांनी ४९६९ हेक्टर क्षेत्रासाठी एकूण ३०.७२ लाख रूपयाचा विम्याचा हप्ता जमा केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खरिप हंगामामध्ये अतिअल्प पाऊस पडल्यामुळे व रब्बी हंगामामध्ये परतीचा पाऊस न पडल्यामुळे पिकांचे व डाळिंब बागांचे १०० टक्के नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सांगोले तालुक्यामधील शेतकऱ्यांच्या पिकांची व डाळिंब बागांची पाहणी शासनाने केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार सांगोले तहसिलमधील सदरहू हंगामात पिकांचे व डाळिंबाचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पिकविम्याची रक्कम देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अनिल बोंडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) खरीप २०१८ मध्ये सोलापूर जिल्हयातील सांगोले तालुक्यात प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत १४०० शेतकऱ्यांनी रु ४.३५ लाख विमा हप्ता भरुन ११५४ हे. क्षेत्र विमा सरंक्षित केले आहे. सहभागी शेतकऱ्यांपैंकी १२४३ शेतकऱ्यांना रक्कम रुपये ३०.६९ लाख नुकसान भरपाई विमा कंपनी मार्फत निश्चित करण्यात आली असून शेतक-यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आली आहे. तसेच रब्बी हंगाम २०१८-१९ मध्ये सोलापूर जिल्हयातील सांगोले तालूक्यातील ३८७२५ शेतक-यांनी रक्कम रू. २४५.७१ लाख विमा हप्ता भरून ७५९०४.९५ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित केले आहे. रब्बी हंगाम २०१८-१९ मधील विमा नुकसान भरपाई अद्याप निश्चित करण्यात आलेली नाही, नुकसान भरपाई निश्चितीची कार्यवाही सुरू आहे. सांगोला तालुक्यात योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनूसार ज्वारी पिकासाठी पेरणीपूर्व नुकसान भरपाई या जोखिमीच्या बाबीअंतर्गत २६५३७ शेतकऱ्यांना ११.७७ कोटी विमा नुकसान भरपाई निश्चित करण्यात आली आहे.

सांगोले तालुक्यात डाळींब (मृग बहार-२०१८) फळपिकासाठी सहभागी शेतकरी ९७१४ असून यापैकी ९६८५ शेतक-यांना नुकसान भरपाई रक्कम रु ५४.६८ कोटी मंजूर करण्यात आली आहे. तसेच डाळींब (आंबिया बहार-२०१८) फळपिकासाठी सहभागी शेतकरी संख्या ६१६८ असून विमा कंपनीमार्फत नुकसान भरपाई निश्चितीची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्हयात केळीच्या झाडांवर करपा व चरका रोगाचा झालेला प्रादुर्भाव

**(४८) * १४०५२७ श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हयात माहे जानेवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान अचानक थंडी वाढल्यामुळे केळीच्या झाडांवर करपा व चरका रोगाचा प्रादुर्भाव झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पिकांच्या नुकसानीचे पंचनामे शासनाकडून करण्यात आले आहेत काय,

(३) असल्यास, त्यानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) सदर बाब निदर्शनास आलेली आहे.

(२) व (३) चरका रोगामुळे झालेले नुकसान या बाबीचा समावेश नैसर्गिक आपत्तीमध्ये करण्यात आलेली नसल्याने पंचनामे करण्यात आलेले नाहीत. परंतु, हवामान आधारीत फळपिक विमा योजना सन २०१८-१९ (आंबिया बहार) केळी पिकास लागू असून, यात कमी तापमानाचा ट्रिगर लागू आहे. माहे जानेवारी, २०१९ मध्ये सलग ३ दिवस ८ अंश सेल्सीयस किंवा त्यापेक्षा कमी तापमान गेल्यामुळे नियमानुसार विमा कंपनी मार्फत फळपिक विमा धारक शेतकऱ्यांना हेक्टरी रु. ३३,०००/- नुकसान भरपाई देय आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्हयातील शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम मिळण्याबाबत

**(४९) * १४१६२३ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमित झनक (रिसोड), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील सुमारे ७७५६८ शेतकऱ्यांनी गतवर्षीच्या खरीप हंगामात अपुऱ्या पावसाने नुकसान होऊनही ६ कोटी ४१ लाखांचा पिक विमा हप्ता विमा कंपन्यांकडे भरणा केला असताना हप्ता भरलेली रक्कमही विमा कंपन्यानी भरपाई म्हणून दिली नसल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती, भातकुली, तिवसा व मोर्शी (जि.अमरावती) या तालुक्यातील सन २०१७-१९ मध्ये शेतकऱ्यांचे सोयाबिन पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे नोव्हेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी, अमरावती यांना दिले असून या तालुक्यातील शेतकऱ्यांनी रिलायन्स कंपनीकडून पिक विमा काढला असतानाही पिकांचे पंचनामे होऊन सुध्दा नुकसान भरपाई मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार अमरावती जिल्हयातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना योग्य पिक विम्याची रक्कम मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अनिल बोंडे :** (१) हे खरे आहे.

(२) अमरावती, भातकुली, तिवसा व मोर्शी (जि.अमरावती) या तालुक्यातील सन २०१७-१९ मध्ये शेतकऱ्यांचे सोयाबिन पिकांचे मोठे प्रमाणात नुकसान झाल्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे नोव्हेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी, अमरावती यांना दिले आहे, हे खरे आहे.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत अमरावती जिल्हयातील अमरावती तालुक्यातील २२८१ शेतकऱ्यांना रु.५९.५४ लाख, भातकुली तालुक्यातील २५१४ शेतकऱ्यांना रु.६३३.९६ लाख, मोर्शी तालुक्यातील १५५१ शेतकऱ्यांना २९९.३४ लाख रुपये इतकी नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वाडा (जि.पालघर) तालुक्यातील दगड खदानींसह क्रशर मशीन सुरु करण्याबाबत

**(५०) * १३८०८८ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यातील ११ दगड खदानींसह क्रशर मशीन बंद करण्याचे आदेश तहसिलदार, वाडा यांनी गौणखनिज उत्खननास प्रतिबंध करण्यात आल्याने दिल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे करोडो रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या क्रशर मशीन बंद करण्यात आल्याने उद्योजकांचे मोठे नुकसान झाले असून शेकडो आदिवासींचा रोजगार बंद झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन सदरहू दगडखदानी व क्रशर मशीन तातडीने सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व जलवायू परिवर्तन मंत्रालय यांचेकडील दि.३/१०/२०१८ रोजीच्या प्रारुप अधिसूचनेनुसार पर्यावरण संवेदनशील (Eco Sensetive Zone) असलेल्या क्षेत्रामध्ये खाणकाम, खदान, खडी, क्रशर, वाळू काढणे/ उपसणे इ.गौण खनिज उत्खननास प्रतिबंध प्रस्तावित असल्याने सदर प्रारुप अधिसूचनेच्या आधारे तहसिलदार, वाडा यांनी दि.२९/३/२०१९ रोजीच्या आदेशान्वये वाडा (जि.पालघर) तालुक्यातील ११ खदान/क्रशर बंद करण्यात आले होते.

तहसिलदार, वाडा यांचे उक्त दि.२९/३/२०१९ रोजीच्या आदेशाविरुध्द ११ पैकी ६ खाणधारकांनी उपविभागीय अधिकारी, वाडा यांचेकडे अपील दाखल केले असता त्यांनी दि.२९/५/२०१९ रोजीच्या आदेशान्वये सदर अपील ग्राह्य धरुन तहसिलदार, वाडा यांचे उक्त आदेश रद्द केले आहे.

त्यानंतर २ खाणधारकांनी उपविभागीय अधिकारी, वाडा यांचेकडे दगड उत्खननाची परवानगी मिळण्याबाबत केलेल्या विनंतीनुसार उपविभागीय अधिकारी, वाडा यांनी दि.२९/५/२०१९ व ३०/५/२०१९ रोजीच्या आदेशान्वये २ खाणधारकांना अनुक्रमे २००० ब्रास व ५०० ब्रास दगड/खडी उत्खनन व वाहतूक परवाना दिला आहे. त्यामुळे उद्योजकांचे नुकसान होऊन शेकडो आदिवासींचा रोजगार बंद झाल्याची बाब निदर्शनास आली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अलिबाग ते कुदे (ता.अलिबाग, जि.रायगड) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(५१) * १३८००४ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग ते कुदे (ता.अलिबाग, जि.रायगड) या रस्त्यावरून एच.पी.सी.एल. खानाव, उसर येथील गेल आणि साळाव येथील जिंदाल कंपनीच्या क्षमतेपेक्षा जास्त भरलेल्या वाहनांची मोठ्या प्रमाणात व वाहतुक होत असल्यामुळे रस्त्यावर खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे रस्त्यावरून प्रवास करणे गैरसोयीचे झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन अलिबाग ते कुदे या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

प्रश्नांकित अलिबाग, रोहा, कणघर वावे रस्ता हा रा.मा. क्र.९१ असा आहे. सदर रस्त्यावरुन ऊसर येथील (खानाव) एचपीसीएल व गेल गॅस कंपनी, तसेच साळाव येथील जिंदाल कंपनी इत्यादी औद्योगिक क्षेत्रातील अतिअवजड वाहनांची मोठ्या प्रमाणात वाहतुक होत असल्यामुळे रस्त्यांचा पृष्ठभाग क्षतिग्रस्त होतो.

(३) सदर रस्त्यावरील सन २०१८-१९ मध्ये अतिवृष्टी तसेच अवजड वाहतुकीमुळे क्षतिग्रस्त झालेल्या लांबीतील खड्डे खडी व डांबराने भरुन वाहतूकीसाठी रस्ते सुस्थितीत ठेवण्यात आले आहेत.

प्रश्नांकीत रस्त्याच्या क्षतिग्रस्त लांबीचे डांबरीकरण व मजबुतीकरण करण्याची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून, कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. सद्य:स्थितीत रस्त्याचे डांबरीकरण व मजबुतीकरणाचे काम प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उंबरगाव (जि.पालघर) येथील प्रजिमा-३ वरील झरी खाड़ी पुलाच्या बांधकामाबाबत

**(५२) * १४१०६५ श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उंबरगाव (जि.पालघर) येथील महाराष्ट्र आणि गुजरात राज्यांना जोडणाऱ्या प्रजिमा-३ वरील झरी खाड़ी पुलावरून पावसाळयात ४ ते ५ फुट उंची वरून पाणी वाहत असल्याने वाहतुक पूर्णत: बंद पडून गावांचा संपर्क तुटत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी नवीन पुल बांधण्याबाबत लोकप्रतिनिधी व नागरिकांनी सातत्याने मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर ठिकाणी नवीन पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय. हे खरे आहे.

(२) व (३) होय. हे खरे आहे.

(४) व (५) विषयांकित पुलाचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धततेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे

-----------------

## दौंड (जि.पुणे) तालुक्यातील संत तुकाराम महाराज पालखी मार्गाच्या चौपदरीकरणासाठी संपादीत करावयाच्या जमिनीचा मोबदला जाहीर करण्याबाबत

**(५३) * १३७२२९ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) तालुक्यातील संत तुकाराम महाराज पालखी मार्गाच्या चौपदरीकरणाचे काम केंद्र शासनाच्या सडक परिवहन मंत्रालयाकडून करण्यात येणार असून या मार्गाची भूसंपादन प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याचे प्रशासनाकडून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महामार्गासाठी दौंड तालुक्यातील पाटस, रोटी, हिंगणीपाडा आणि वासुंदे या गावातील जमिनी संपादीत होणार असून या जमिनीचा मोबदला अदयाप जाहीर करण्यात आला नसल्याने संबंधित शेतक-यांमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाली असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रस्त्यासाठी संपादीत करण्यात येणा-या जमिनीचे विवरण सडक परिवहन आणि राजमार्ग मंत्रालयाने दिनांक ४ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास अधिसूचनेद्वारे प्रसिध्द केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन महामार्गासाठी संपादीत करावयाच्या जमिनीचा मोबदला जाहीर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय हे खरे आहे.

(२) अशी बाब नाही.

(३) अंशत: खरे आहे.

दौंड तालुक्यातील मौजे रोटी, हिंगणीपाडा, पाटस आणि वासुंदे या ४ गावांची ३A अधिसुचना दिनांक ९ मार्च २०१८ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झालेली आहे.

(४) संपादीत जमिनीचा मोबदला जाहीर करण्यासाठी संपादीत जमिनीचे मूल्यांकन करून ते प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे कार्यालयाकडे मान्यतेसाठी दि.३०.०४.२०१९ चे पत्रान्वये फेरसादर करण्यात आले आहे.

मान्यता प्राप्त होताच पुढील आवश्यकती कार्यवाही करण्याची दक्षता जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयाकडून घेण्यात येत आहे.

(५) अशी बाब नाही.

-----------------

## महानंद दुध महासंघास २२.७८ कोटी रुपयांचे अनुदान देण्याबाबत

**(५४) * १४१३२२ श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महानंद दुध महासंघ शासनाच्या धोरणाप्रमाणे तालुका व जिल्हा दुध संघाला वरकड खर्च म्हणून प्रतिलिटर २.५० रुपये देत असून दुध खरेदीसाठी महासंघाला प्रति लिटर १.६५ रुपये ऐवढा वाहतुक खर्च येत असल्याने प्रति लिटर ४.१५ रुपये प्रत्यक्ष खर्चात वाढ झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी सचिव (पदुम) व आयुक्त (दुग्ध व्यवसाय विकास) यांनी महानंद दुध महासंघाच्या संचालक मंडळाच्या बैठकीत विशेष बाब म्हणून शासनामार्फत आर्थिक मदत देण्याचे मान्य केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानंद दुध महासंघाने शासन निर्णयानुसार दुध उत्पादकांना गाय दुध दर प्रतिलिटर २५ रुपये अदा केल्यामुळे दिनांक १ ऑगस्ट, २०१९ ते ३१ जानेवारी, २०१९ या कालावधीत ४.५६ कोटी लिटर दुध खरेदीवर महासंघास तोटा झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दुध महासंघाचा तोटा भरुन काढण्याकरीता विशेष बाब म्हणून रुपये २२.७८ कोटी अनुदान देण्याचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून उक्त प्रस्तावावर कार्यवाही झाली नसल्याची बाब लोकप्रतिनिधीनी दिनांक ६ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास शासनाच्या निदर्शनास आणून दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने दुध महासंघास अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) महाराष्ट्र राज्य दूध महासंघामार्फत दूध खरेदीसाठी वरकड खर्च रु.२.५० प्र.लि. व वाहतुक खर्च रु.१.६५ प्र.लि. असे एकत्रित रु.४.१५ प्र.लि. देण्यात येत आहेत हे खरे आहे.

शासनामार्फत निश्चित करण्यात येत असलेले दर हे केवळ शासकीय दूध योजनेकरीता निश्चित करण्यात येतात. शासनाने दिनांक २७.९.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये सरसकट रु.३/- असे कमिशन दर (वाहतुक कमिशनसह) निश्चित केले आहेत.

(२) दूधासाठी प्रति लिटर किती वरकड खर्च व वाहतुक कमिशन द्यावा याबाबत महासंघ आपल्या स्तरावर निर्णय घेत असतो. दिनांक ३०.७.२०१८ रोजीच्या महासंघाच्या संचालक मंडळाच्या बैठकीत मा.मंत्री (पदुम) व सचिव (पदुम) उपस्थित होते. शासनाने सातत्याने महासंघास केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन दिले आहे. यापुढेही प्रकरणपरत्वे प्रस्ताव तपासून महासंघाच्या आर्थिक सहाय्यासंदर्भात निर्णय घेण्यात येईल.

(३) दिनांक १.१२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघाने गाय दूध खरेदी दरात रु.२५/- प्र.लि. असा दर दिल्यामुळे दिनांक १.८.२०१८ ते ३१.१.२०१९ या कालावधीत रु.२२.७९ कोटी इतका संभाव्य आर्थिक तोटा होणार असल्याचे कळविले आहे, हे खरे आहे.

(४) दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या पत्रान्वये लोकप्रतिनिधींनी दूध महासंघास विशेष बाब म्हणून रु.२२.७८ कोटी अनुदान स्वरुपात देण्याबाबत विनंती केली आहे, हे खरे आहे. मात्र, सदर प्रस्तावावर कार्यवाही झाली नसल्याबाबत दिनांक ६ मे, २०१९ रोजीचे लेखी निवेदन शासनास प्राप्त झाल्याचे आढळून आलेले नाही.

(५) शासनाने दिनांक २० जुलै, २०१८ व दिनांक ३१ जुलै, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये पिशवीबंद दूध वगळून प्र.लि. रु.५/- असे अनुदान दूधासाठी मंजूर केले आहे. महानंद या संस्थेमार्फत पिशवीबंद दूधाची विक्री

केली जाते. महासंघाने पिशवीबंद दूधासाठी केलेल्या दूध विक्रीस विशेष बाब म्हणून अनुदान देण्याबाबत विनंती केली आहे. सदर बाब शासनाने घोषित केलेल्या योजनेतील अटी व शर्तीनुसार देय होत नाही. त्यामुळे सदर बाब तपासून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## माटणे (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदूर्ग) परिसरात अनधिकृतरित्या काळा दगड उत्खननासह चिरेखाणी सुरु केल्याबाबत

**(५५) * १३५८९७ श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माटणे (ता.दोडामार्ग,जि.सिंधूदूर्ग) परिसरातील काही गावात भुमीहीन असलेल्या नागरिकांना उपजिविका करण्यासाठी शासनाने दिलेल्या शेकडो एकर जमिनींमध्ये काही नागरिकांनी दलालांच्या मार्फत बनावट कागदपत्रे तयार करुन काळा दगड उत्खनन तसेच चिरेखाणी सुरु केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात एका राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्याने तहसीलदार, दोडामार्ग यांचेकडे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार केली असतानाही या दलालांविरुध्द कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून काळा दगड उत्खनन करणाऱ्यांविरुध्द तसेच येथील चिरेखाणी व दलालांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे भाईंदर (जि.ठाणे) येथील जमिनीच्या गैरव्यवहाराबाबत

**(५६) * १३७५६४ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे भाईंदर (जि.ठाणे) येथील सर्व्हे नं.४८१ क्षेत्र ४ हेक्टर ६० गुंठे जमीन कागदपत्रावरून शासनाची असल्याचे स्पष्ट होत असतानाही मीरा भाईंदर महापालिका नगररचना विभाग, तलाठी, मंडळाधिकारी व तहसिलदार यांनी संगनमताने सदर जमीन आर.एन.ए.बिल्डरच्या ताब्यात दिल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार अवैधरित्या जमीन ताब्यात देणारे संबंधित अधिकारी व आर.एन.ए.बिल्डर यांच्यावर कारवाई करून जमीन शासनाच्या ताब्यात घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशी बाब माहे एप्रिल, २०१९ वा त्यादरम्यान निदर्शनास आली नाही.

तथापि, मौजे भाईंदर, ता.जि.ठाणे येथील जुना स.नं. ४८१ नवीन स.नं. ११३/२ व ११३/४ ही जमीन पूर्वी दि इस्टेट इन्व्हेस्टमेंट कंपनी प्रा. लि. यांच्या नावे दाखल होती. फेरफार क्र. ९११, दि.१५.०१.१९५३ नुसार सदर जमीन “सरकारी बिन आकारी पडीत” म्हणून नोंद करण्यात आली.

तद्नंतर, सदर जमिनीच्या खाजगी व्यक्तींच्या लाभात नोंदी झाल्या असून फेरफार क्र.६३१३, दि.१२.०२.२००८ अन्वये सदर जमीन मे. आर. एन. ए. कॉर्प. प्रा. लि. यांच्या नावे करण्यात आली आहे.

(२) व (३) या संदर्भात प्राप्त तक्रारीनंतर सदर जमिनीमध्ये शासनाचे हितसंबंध दिसून आल्याने जिल्हाधिकारी, ठाणे यांनी त्यांच्या दि.१८.१२.२०१५ च्या पत्रान्वये आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना सदर जमिनीत शासनाच्या हितसंबंधाबाबत निर्णय होईपर्यंत सदर जमिनीवरील बांधकाम परवानगी स्थगित करण्यात यावी, असे कळविले आहे. त्यानुषंगाने

महानगरपालिकेने त्यांच्याकडील पत्र दि.२३.११.२०१५ अन्वये सदर बांधकाम परवानगीस स्थगिती दिली असून सदर स्थगिती अद्याप कायम आहे.

तसेच, मौजे भाईंदर, ता.जि.ठाणे येथील सदर मिळकतीबाबतचे फेरफार क्र. ४६१६ व ५११२ पुनरीक्षणात घेण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, ठाणे व विभागीय आयुक्त, कोकण यांच्याकडून शासनास प्राप्त झाला असून त्यानुषंगाने मा.मंत्री (महसूल) यांच्या स्तरावर पुनरीक्षणाची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पन्हाळा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील कासारी नदीवरील माजगाव-पोर्ले पुलाचे दुपदरीकरण करण्याबाबत

**(५७) * १३५१८९ श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पन्हाळा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील कासारी नदीवरील माजगाव-पोर्ले पूल अत्यंत महत्वाचा पूल असून या पुलावरून परिसरातील ३० ते ३५ गावातील तसेच साखर कारखान्यासाठी उस वाहतूक सुरु असते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पूल हा अरुंद असून पुलावरून केवळ एकेरी वाहतुक करता येत असल्याने वारंवार वाहतूक कोंडी होऊन प्रवाशांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर पुल दुपदरी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३), (४) व (५) सदर पूलाचे काम हे निकष,मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

## कारंजा (जि.वाशिम) शहरातील नवीन २६ लेआऊटला अनधिकृतरित्या मंजुरी दिल्याबाबत

**(५८) * १४००१८ श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कारंजा (जि.वाशिम) शहरातील नवीन २६ लेआऊट तत्कालीन उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व नायब तहसीलदार यांनी अधिकार नसतानाही मंजूर केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खर आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी निवासी उपजिल्हाधिकारी, वाशिम यांनी चौकशी करून संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध विभागीय चौकशी करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावानुसार उक्त लेआऊटला अनधिकृतरित्या मंजुरी देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) वाशिम जिल्ह्यातील कारंजा शहराच्या मूळ विकास योजनेतील व हद्दवाढ क्षेत्रातील काही अकृषक प्रकरणांमध्ये अनियमितता झाल्याचे सकृतदर्शनी निदर्शनास आले आहे. सदर अनियमिततांस जबाबदार असलेल्या अधिका-यांविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई सुरु करण्याचे जिल्हाधिकारी वाशिम यांनी विभागीय आयुक्त, अमरावती यांच्याकडे दि.०६.०६.२०१९ च्या पत्रान्वये प्रस्तावित केले आहे. त्यानुषंगाने संबधितांविरुद्ध विभागीय चौकशी सुरू करण्यासाठीचा परिपूर्ण प्रस्ताव तातडीने शासनास सादर करण्याच्या सूचना विभागीय आयुक्त,

अमरावती यांना दि.१७.०६.२०१९ रोजीच्या शासन पत्रान्वये देण्यात आल्या असून, विभागीय आयुक्त, अमरावती यांच्याकडून या संदर्भात प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे अंदरसुल (ता.येवले, जि.नाशिक) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे महिलेचा झालेला मृत्यु

**(५९) * १४०८३० श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंदरसुल (ता.येवले, जि.नाशिक) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे एका महिलेचा मृत्यु झाल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया झाल्यानंतर सदरहू महिलेला रात्री असह्य वेदना सुरु झाल्यामुळे नातेवाईकांनी डॉक्टर व परिचारिका यांच्याशी संपर्क साधुनही कर्मचा-यांसह डॉक्टरांनी दुर्लक्ष केल्यामुळे महिलेचा मृत्यु झाला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार निष्काळजीपणा करणाऱ्या संबंधित डॉक्टर व परिचारिकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकिय अधिकारी व आरोग्य सेविका यांनी दि. १३.५.२०१९ रोजी कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया झालेल्या सर्व रुग्णांची वैद्यकिय तपासणी केली त्यामध्ये श्रीमती वर्षा अहिरे यांनाही तपासले होते व पोट दुखणे व धापा लागत असल्यामुळे त्यांना वैद्यकिय अधिकारी यांनी तपासून औषधोपचार केले होते. परंतु श्रीमती वर्षा अहिरे यांचा दि.१४.५.२०१९ रोजी दुर्दैवाने मृत्यू झाला.

(३) सदर मृत्यू प्रकरणाची स्त्रीरोग तज्ञ समाविष्ट असलेल्या त्रीसदस्यीय समितीमार्फत चौकशी करण्यात आली असून चौकशी समितीच्या निष्कर्षानुसार सदर मातेची दोन वेळा सिझेरियन प्रसुती झालेली असल्यामुळे अतिरिक्त काळजी घेणे गरजेचे होते. सदर रुग्णाला रात्री धाप लागल्यानंतर वेळेत संदर्भित करणे आवश्यक होते आणि एकच वैद्यकिय अधिकारी असल्यामुळे सर्व कामाचा ताण एकाच वैद्यकिय अधिकाऱ्यांवर होता. मृत्यूचे अन्वेषणही करण्यात आलेले आहे. प्राथमिक अंदाजानुसार मृत्यूचे कारण हे हायपोव्होलुमिक शॉक असे नमूद केले आहे. संबंधीतांवर नोटीस बजाविण्यात आली असून खुलासा मागविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तीसगाव (ता.जि.औरंगाबाद) येथील शासनाने संपादीत केलेल्या जमिनीची विक्री केल्याबाबत

**(६०) * १३९१३२ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तीसगाव (ता.जि.औरंगाबाद) या औरंगाबाद शहराजवळच्या गावातील गट नं.२१६ मधील, १३ हेक्टर ५३ आर या शासनाने संपादीत केलेल्या जमिनीच्या मालकी हक्काच्या नोंदीमध्ये फेरफार करुन हीच जमीन पुन्हा राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ च्या भूसंपादनात शासनालाच विक्री केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासदंर्भात चौकशी करुन तहसिलदारांनी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अहवालाचे निष्कर्ष काय व त्यानुसार दोषी अधिकारी व अन्य संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) होय हे खरे आहे.

(३) गट नं.२१६ मधील एकूण क्षेत्र व वेगवेगळया प्रयोजनासाठी संपादन झालेले क्षेत्र तसेच राष्ट्रीय महामार्ग क्र.२११ करिता संपादित क्षेत्र या बाबी तपासून तहसिलदार यांनी अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालामध्ये खालीलप्रमाणे निष्कर्ष आढळतात.

(i) या पूर्वी याच गटातून १.५०, ०.७६ व ०.३३ हे.आर. जमिन संपादन झालेली असून सदर संपादनाच्या नोंदी ७/१२ उताऱ्यावर लागलेल्या नाहीत.

(ii) एकाच खरेदी खताची दोन वेगवेगळया फेर फारान्वये नोंद घेतल्यामुळे सदर गटात गुंतागुंत निर्माण झाल्यामूळे उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांचे दि.२४.०५.२०१९ च्या पत्रानुसार अपर तहसिलदार, औरंगाबाद यांना सदर गटामधील संबंधित भूसंपादन संस्था व संबंधित खातेदार यांना सुनावणीची संधी देऊन स्वयंस्पष्ट अहवाल सादर करणेबाबत कळविले आहे. तसेच दोषी कर्मचाऱ्यांविरूध्द नावानिशी शिस्तभंग विषयक/फौजदारी कारवाई प्रस्तावित करणे बाबत कळविले आहे. अपर तहसिलदार यांच्या स्तरावर सदर सुनावणीची व चौकशीची प्रक्रिया सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मे.एच.जी.इन्फ्रा इंजिनियर प्रा. लिमिटेड, नागपूर या कंपनीने शेतकऱ्यांची केलेली फसवणूक

**(६१) * १४२२२० श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावनेर ते खापा (ता.सावनेर, जि.नागपूर) या सिमेंट रस्त्याचे बांधकाम मे.एच.जी.इन्फ्रा इंजिनियर प्रा. लिमिटेड, नागपूर या कंपनीतर्फे सुरू असून या रस्त्याच्या बांधकामाकरीता लागणाऱ्या साहित्याची वाहतुक मोठया प्रमाणात करण्यात येत असल्यामुळे परिसरातील शेती पिकांचे धुळकणामुळे नुकसान झाल्याचे दिनांक १५ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या याप्रकरणी आजणी (ता.सावनेर) येथील नेमराज योगराज हाकंदे, भोजराज सुखदेव हाकंटे, अशोक रामाजी घाटे यांनी तहसिलदार, सावनेर यांच्याकडे दिलेल्या लेखी तक्रारीच्या अनुषंगाने या कंपनीने प्रत्येकी ३७,६८०, ३५,९२०, १९,७६० रूपये आर्थिक मदत मंजूर केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मंजूर रक्कम संबधीत शेतकऱ्यांना न देता या कंपनीने प्रशासनातील संबंधित अधिकाऱ्यांशी संगनमत करून त्या शेतकऱ्यांच्या बनावट सहया करुन हडप केल्यामुळे शेतकऱ्यांनी पोलीस स्टेशन, सावनेर यांच्याकडे दिनांक ६ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास लेखी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करून कंपनी व प्रशासनातील संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची रक्कम देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) अशा प्रकारची तक्रार तहसिलदार, सावनेर यांचेकडून माहे जानेवारी २०१८ मध्ये प्राप्त झाली. तथापि सदर तक्रारीमध्ये प्रश्नात नमूद केलेल्या व्यक्तींची नावे दिसून आली नाहीत.

तसेच प्रस्तुत तक्रारीच्या अनुषंगाने प्रश्नात नमूद केलेल्या रक्कमांची अर्थिक मदत कंपनीने मंजूर केल्याबाबतची माहिती या विभागास प्राप्त झालेली नाही.

(३) प्रस्तुत प्रकरणी शासनामार्फत कोणतीही रक्कम मंजूर केलेली अथवा कोणत्याही शेतक-यांना प्रदान करण्यात आली नसल्यामुळे प्रशासनातील संबंधीत अधिका-यांशी संगनमत करुन रक्कम हडप करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

पोलीस स्टेशन, सावनेर व्दारे सदर तक्रारीची माहिती उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),नागपूर यांना दि.२२.०२.२०१९ अन्वये सादर करुन प्रत विभागाकडे अग्रेषित केल्यावरुन प्रश्न २ व ३ मधील तक्रार पोलीस स्टेशन, सावनेर यांच्याकडे केली असल्याची माहिती विभागास प्राप्त झाली आहे.

(४) अ) अ.क्र.२ व ३ मधिल उत्तराच्या अनुषंगाने कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

ब) विषयांकित कामाच्या ठिकाणी वळणालगतच्या शेतक-यांचे काही अंशी झालेले नुकसान हे कंत्राटदाराच्या चुकीमुळे झाले असल्याने, तहसिलदार यांचेकडून तक्रार प्राप्त होताच शासनातर्फे दि.२२.०२.२०१८ च्या पत्रांन्वये संबंधित कंत्राटदारास आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यात घरकुल बांधकामाकरीता देण्यात येणारे मोफत वाळू पास सुरू करण्याबाबत

**(६२) * १४२२२४ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लाभार्थ्यांच्या बांधकामाकरिता मिळणारे मोफत वाळू पास अप्पर जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या दिनांक ६ मे, २०१९ च्या आदेशान्वये रद्द केल्याचे दिनांक १८ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरीता शासनाच्या गृहनिर्माण योजनेंतर्गत घराच्या बांधकामासाठी स्वामित्वधन न आकारता पाच ब्रास एवढी वाळू देण्यास परवानगी देऊन काही लाभार्थ्यांना वाळू वाहतूक परवाने दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मोफत वाळू पास रद्द केल्यामुळे जिल्ह्यातील घरकुलांची कामे प्रलंबित असुन मोफत वाळू पास सुरू करण्याची मागणी जिल्ह्यातील घरकुल लाभार्थ्यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून अमरावती जिल्ह्यात घरकुल बांधकामाकरीता देण्यात येणारे मोफत वाळू पास सुरू करण्याबात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) महाराष्ट्र शासन अधिसूचना, दि.१७ नोव्हेंबर, २०१८ नुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लोकांकरीता असलेल्या शासनाच्या गृहनिर्माण योजनेअंतर्गत घरांच्या बांधकामासाठी स्वामित्वधन न आकारता प्रति लाभार्थी ५ ब्रास पर्यंत वाळू पर्यावरण अनुमतीप्राप्त विर्निर्दिष्ट वाळूघाटातून उपलब्ध करुन देण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यानुषंगाने केंद्र शासनाच्या पर्यावरण व जलवायू परिवर्तन मंत्रालय मार्गदर्शक सूचना-२०१६ मधील सूचनांचा परामर्श घेवून तहसिलदार यांनी तयार केलेल्या स्त्रोतांच्या यादींमधून त्या गावाजवळ उपलब्ध असलेल्या स्त्रोतांमधून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लाभार्थ्यांच्या घरांच्या बांधकामाकरीता वाळू उत्खननाची परवानगी तहसीलदार यांनी द्यावी असे जिल्हाधिकारी, अमरावती यांनी सूचित केले होते. तथापि, शासनाच्या क्र.गौखनि-१०/०११९/प्र.क्र.५/ख-२, दि.१२/२/२०१९ रोजीच्या परिपत्रकान्वये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लाभार्थी बांधकाम करीत असलेल्या घराजवळच्या आणि पर्यावरणविषयक मंजूरी प्राप्त वाळूगटातून उत्खनन परवानगी देण्याबाबत सूचना आहेत. त्यानुसार दि.६ मे,२०१९ रोजीच्या आदेशान्वये जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दि.१३/२/२०१९ ते २८/२/२०१९ या कालावधीत घरकुल लाभार्थ्यांसाठी वाळू उपलब्ध करुन देण्याकामी पर्यावरण अनुमती प्राप्त नसलेल्या वाळूघाटावरुन दिलेले वाळू परवाने रद्द केले. त्यानंतर पर्यावरण अनुमतीप्राप्त १५ आरक्षित वाळूगटांमधून वाळू उपलब्ध करण्यास्तव शुन्य रॉयल्टी पासेस जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत निर्गमित करण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बहिरम-बोदवड-करजगाव-लखनवाडी-तळेगाव-मोहना (ता.चांदूरबाजार, जि.अमरावती) हा रस्ता दर्जोन्नत करण्याबाबत

**(६३) * १४१९२३ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदूरबाजार (जि.अमरावती) तालुक्यातील बहिरम - बोदवड - करजगाव - लखनवाडी - तळेगाव - मोहना या इतर जिल्हा मार्गाचे प्रमुख जिल्हामार्गात दर्जोन्नत करण्यात यावे अशी मागणी लोकप्रतिनिधींनी मा.राज्यमंत्री यांचेकडे दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मार्गाच्या दर्जोन्नतीचा प्रस्ताव मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम, जिल्हा अमरावती यांनी दिनांक २६ जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास अवर सचिव, नियोजन, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) या रस्ता दर्जोन्नतीच्या प्रस्तावास शासनाने मान्यता दिली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कणकवली (जि.सिंधुदुर्ग) येथील सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये झालेला गैरव्यवहार

**(६४) * १३६७१७ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कणकवली (जि.सिंधुदुर्ग) येथील सार्वजनिक बांधकाम विभागाने राबविलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये ठेकेदारांनी खोटी माहिती सादर करून व सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच जिल्हा परिषद बांधकाम विभागामध्ये शासकीय सेवेतील अधिकारी यांचे प्रमाणपत्र लावून शासनाची फसवणूक करून कामे मिळविल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निविदा प्रक्रियेत कनिष्ठ अभियंता यांचाही प्रत्यक्ष सहभाग असल्याने त्यांच्यावर कारवाई करण्याची तसेच टेंडर विभागाच्या अधिकारी यांचीही चौकशी करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.
(२) या संदर्भात श्री.भूपेंद्र सतिश मोंडकर यांनी दि.१७/११/२०१८ व दि.३०/११/२०१८ अन्वये मंडळ कार्यालय, रत्नागिरी येथे तक्रार अर्ज केला आहे.
(३) व (४) सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, कुडाळ मु.कणकवली यांनी केलेल्या चौकशीत अधिकारी अथवा कर्मचारी दोषी असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आलेले नाही.

-----------------

## चंदगड व आजरा (जि.कोल्हापूर) येथील ग्रामीण रुग्णालयात औषधे उपलब्ध करुन देण्यासह वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत

**(६५) * १३७१०४ श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंदगड व आजरा (जि.कोल्हापूर) हे तालुके डोंगराळ व अतिदुर्गम भागात येत असून तेथील ग्रामीण रुग्णालय तसेच हेरे, नेसरी, वाटंगी, आजरा येथील ग्रामीण रुग्णालयात सर्पदंश, श्वानदंश व इतर आजारांवरील औषधांच्या अभावासह वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची कमतरता असल्यामुळे रुग्णांना खाजगी रुग्णालयात उपचारासाठी जावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रुग्णालयात रुग्णांना सर्व आजारांसाठी औषधे उपलब्ध करुन देण्यासह वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबतची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) ग्रामीण रुग्णालय, आजरा, चंदगड व नेसरी येथे आवश्यक असलेला औषधसाठा उपलब्ध आहे, तसेच कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात यावी याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीचे दिनांक २८.०७.२०१७ रोजीचे पत्र या विभागास प्राप्त झालेले आहे,

(३) शासनपत्र दिनांक ०२.०२.२०१८ अन्वये वैदयकीय अधिकारी गट-अची १०० टक्के मंजूर पदे भरण्याचा निर्णय घेतला असून दिनांक २७.१२.२०१८ रोजी ८७७ पदांची भरतीसाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे,

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात तीन कोटी रुपयांच्या बनावट निविष्ठा जप्त करण्यात आल्याबाबत

**(६६) * १३५१७० श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात भेसळयुक्त निविष्ठा निर्मिती करणाऱ्या निविष्ठांचे नमुन्यांचे अहवाल अप्रमाणित असल्याचे कृषी विभागाने दिनांक १५ व १६ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास विविध भागात धाडी टाकून जप्त केलेल्या तीन कोटींच्या निविष्ठामध्ये आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात कोणकोणत्या ठिकाणी धाडी टाकण्यात आल्या असुन त्यामध्ये काय निदर्शनास आले आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(४) असल्यास, त्यानुसार बनावट निविष्ठा शेतकऱ्यांना देवुन त्यांची फसवणूक करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विंलंबाची कारण काय आहेत ?

**डॉ. अनिल बोंडे :** (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) राज्यात, मे. साव्हियो बायो ऑर्गेनिक्स ॲन्ड फर्टिलायझर्स प्रा. लि. कराड, जिल्हा सातारा या दाणेदार मिश्र खत उत्पादकाचे उत्पादनस्थळी तसेच, कळम तालुका उस्मानाबाद, माहूर जिल्हा नांदेड, अकोला सांगली, कोल्हापूर इत्यादी ठिकाणी विक्रेत्याकडे तपासणी करण्यात आली. संबंधित उत्पादकाकडे कच्चा माल खरेदीचे व मिश्रखत विक्रीचे अभिलेख उपलब्ध नसल्यामुळे विक्री बंद आदेश देण्यात आले, मिश्र खताचे नमुने काढण्यात आले व त्यानुषंगाने पुढील कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

(३) चौकशीअंती, उत्पादकाने उत्पादित केलेला नियमबाहय मिश्र खतसाठा १८:१८:१०, २०:२०:०, व १०:२०:२० आढळून आलेला आहे. या सर्व ठिकाणी विक्री बंद आदेश देऊन नमुने काढले व शासकीय प्रयोगशाळेत तपासले असता, २६ नमुन्यांपैकी १७ नमुने अप्रमाणित आढळून आले आहेत.

(४) सदर प्रकरणी वरील उत्पादक कंपनीचे दाणेदार मिश्र खत निर्मिती प्रमाणपत्र क्र. GM०२४ दिनांक २०/०५/२०१९ रोजी रद्द करण्यात आलेले आहे. तसेच, वरील उत्पादकाच्या अकोला येथील गोदामामध्ये असलेले विद्राव्ये खते

व सुक्ष्म मुलद्रव्ये व किटकनाशके यांचा एकूण रु. २,१९,०८,५९३/- इतक्या रक्कमेचा साठा जप्त करण्यात आलेला आहे. सदर साठयापैकी काही किटकनाशकांचा परवान्यात समावेश नाही. तसेच, किटकनाशकांचे लेबलक्लेम कायद्यातील तरतूदीनुसार नसल्याने साठा जप्त करण्यात आलेला आहे. या कारणामुळे उत्पादकावर एमआयडीसी, अकोला, पोलिस ठाणे येथे दि.०१/०४/२०१९ रोजी गुन्हा क्र. ६८ दाखल करण्यात आलेला आहे.

त्याचप्रमाणे, उत्पादकाने कराड येथे उत्पादनस्थळी अभिलेख उपलब्ध करुन न देणे, मोठया प्रमाणात नमुने अप्रमाणित आल्याने, उत्पादक कंपनीचे मालक श्री. सावियो परेरा यांचेविरुध्द कराड पोलिस ठाण्यामध्ये देखील गुन्हा क्रमांक २०२, दि. ३१/०३/२०१७ रोजी गुन्हा दाखल केलेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कसाल-मालवण (जि.सिंधुदूर्ग) या रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत

**(६७) * १४१४४३ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कसाल-मालवण (जि.सिंधुदुर्ग) या मुख्य रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे केल्यामुळे रस्त्यावर खड्डे पडून अपघाताचे प्रमाण वाढल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मालवण यांच्याकडे नगरपालिकेचे उपाध्यक्ष, पदाधिकारी व ग्रामस्थ यांनी निवेदनाव्दारे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून कसाल-मालवण या स्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

प्रश्नांकित कसाल मालवण रस्ता हा राज्य मार्ग क्र. १८२ असा आहे. सदर रस्त्याचे काम निविदेतील अटी व शर्ती मानकानुसार करण्यात आलेले आहे. सदर रस्त्यावर कुठेही खड्डे पडलेले नाहीत.

(२) सदर रस्त्याबाबत कोणतेही निवेदन प्राप्त नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील दुध उत्पादक शेतकऱ्यांना दिले जाणारे अनुदान सुरु करण्याबाबत

**(६८) * १३४९६४ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुध उत्पादक शेतकऱ्यांना दिले जाणारे प्रति लिटर ५ रुपये अनुदान शासनाने माहे नोव्हेंबर, २०१८ पासून बंद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील अपुऱ्या पडलेल्या पावसामुळे जनावरांच्या चारा व पाण्याचा प्रश्न निर्माण झाला असून महागाईमुळे पशूखाद्याचे दर मोठ्या प्रमाणात वाढले असताना शासनाने अनुदान बंद केल्यामुळे दुध उत्पादक शेतकऱ्यांचे दुहेरी आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, सदरहू अनुदान बंद करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, दूध उत्पादक शेतकऱ्यांना दिले जाणारे अनुदान पूर्ववत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील डहाणू कासा उधवा राज्यमार्गावरील वाघाडी कालव्यावरील पुलाच्या बांधकामाबाबत

**(६९) * १४१८११ श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील डहाणू कासा उधवा राज्यमार्गावरील डहाणू पूर्वेकडील गावांना जोडणारा वाघाडी कालव्यावरील पूल वाहतुकीसाठी धोकादायक झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार उक्त ठिकाणी नवीन पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

कासा सायवन रा.मा. ७२ या रस्त्यावर कि.मी. ४७/१५५ मध्ये अस्तित्वात असलेल्या वाघाडी पूलाचे बांधकाम पाटबंधारे विभागामार्फत आठ वर्षापूर्वी करण्यात आलेले आहे.

सदर पूलाची पाहणी करण्यात आलेली असून पूल सुस्थितीत असल्याचे आढळून आले आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वैजापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(७०) * १४२२८० श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैजापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यात प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे रस्त्यावर खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे ९ नागरिकांचा मृत्यू झाल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार वैजापूर तालुक्यातील रस्त्यांची दुरुस्ती तसेच अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

प्रश्नाधीन रस्ते सुस्थितीत आहेत. पोलिस स्टेशनच्या अहवालानुसार वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे सदर मृत्यु झाले आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मालेगाव (जि.वाशिम) तालुक्यातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेच्या लाभार्थ्यांना अनुदान देण्याबाबत

**(७१) * १४२४४२ श्री.अमित झनक (रिसोड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.वाशिम) तालुक्यातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन व बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेंतर्गत सन २०१८-१९ या वर्षातील १०३ पात्र लाभार्थ्यांना पहिल्या टप्प्यातील अनुदान अद्याप प्राप्त झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजनेतील संबंधित लाभार्थ्यांना अनुदान न मिळाल्यामुळे त्यांच्या विहिरीची कामे बंद झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार मालेगाव तालुक्यातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन व बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेंतर्गत लाभार्थ्यांना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अनिल बोंडे :** (१) हे खरे नाही. सन २०१८-१९ या वित्तीय वर्षात मालेगाव तालुक्यामध्ये (जि.वाशिम) डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना या दोन्ही योजनांतर्गत निवड करण्यात आलेल्या पात्र लाभार्थ्यांना पहिल्या टप्प्यातील केलेल्या कामाप्रमाणे अनुदान देण्यात आले आहे. त्यामुळे पहिल्या टप्प्यातील अनुदान रखडले हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.
(३) सदर योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना कामाच्या मुल्यांकनानुसार अनुदान उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सुरवाडी, ठाणाठुणी व भारवाडी करजगांव (ता.तिवसा, जि.अमरावती) या पुनर्वसित गावांत मुलभुत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(७२) * १४१७६६ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुरवाडी, ठाणाठुण व भारवाडी करजगांव (ता.तिवसा, जि.अमरावती) या पुनर्वसित गावांत रस्ते, नाली, पाणी अशा आवश्यक सुविधा उपलब्ध नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पुनवर्सन झालेल्या गावांत नागरिकांना सुविधा मिळत नसल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान अमरावती जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मुद्दा उपस्थित केला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्या अनुषंगाने सदर गावात मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) हे खरे नाही. संबंधित पुनर्वसित गावे नागरी सुविधांसह १९९३-९४ मध्ये जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करण्यात आली असुन सदर गावे महसुली खेडी म्हणून घोषित करण्यात आली.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पाली (ता.सुधागड, जि.रायगड) येथे ग्रामीण रुग्णालय सुरु करण्याबाबत

**(७३) * १३९८६८ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाली (ता.सुधागड, जि.रायगड) येथे सन १९६२ साली बांधण्यात आलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रातंर्गत ५५ गावे, ७३ वाडया व २ आश्रमशाळा येत असून ग्रामीण भागातील सुमारे ४५ हजारापेक्षा अधिक नागरिक अवलंबून असलेल्या या प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये रुग्णांच्या उपचारासाठी गैरसोय होत असल्याने येथील नागरिकांना आरोग्यसेवा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सन २००८ मध्ये या प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयात रूपांतर करण्याचा शासनाने निर्णय घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ग्रामीण रुग्णालयास सन २००८ मध्ये मंजूरी मिळालेली असतानाही ग्रामीण रुग्णालयाच्या बांधकामास अद्याप सुरुवात झालेली नसून या रुग्णालयासाठी मंजूर असलेले वैद्यकीय अधिकारी, विशेष रोग तज्ज्ञ, क्ष-किरण, सोनोग्राफी तसेच अन्य सोयीसुविधा व यंत्र सामुग्रीही पुरविण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार १० वर्षांपूर्वी मंजूर केलेल्या पाली येथील ग्रामीण रूग्णालयाच्या उभारणीच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) पाली ता.सुधागड, जि.रायगड येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय सुरु करण्यास दि.२१.०८.२००८ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आलेली असून २०१६ मध्ये जिल्हाधिकायाकडून ९० आर जागा उपलब्ध करुन देण्यात आली. इमारत व निवासी गाळे यांची सुधारीत अंदाजपत्रके व आराखडे यांची तांत्रिक तपासणी करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागास विनंती करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे वर्वे खुर्द (ता.भोर, जि.पुणे) या गावासाठी पुणे-बेंगलोर महामार्गाच्या कामादरम्यान भुयारी मार्ग किंवा उड्डाणपूल बांधण्याबाबत

**(७४) * १३७२५६ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे वर्वे खुर्द (ता.भोर, जि.पुणे) या गावासाठी पुणे बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग क्र.४ च्या सहापदरीकरणाच्या कामादरम्यान भुयारी मार्ग किंवा उड्डाण पुल न बांधल्यामुळे ग्रामस्थांची गैरसोय होत असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित प्राधिकरणाच्या धोरणानुसार रस्त्यालगतच्या प्रत्येक गावाला नियमित वाहतूकीसाठी भुयारी मार्ग किंवा उड्डाणपूलाची सुविधा देणे आवश्यक असताना ३००० लोकसंख्येच्या या गावाला सदर सुविधा न दिल्याने जीवाची भीती पत्करून ग्रामस्थांना रस्ता ओलांडावा लागत असून त्याबाबत संबंधिताकडे मागणी करूनही कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार या गावासाठी भुयारी मार्ग किंवा उड्डाणपूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) पुणे-बंगलोर राष्ट्रीय महामार्ग क्र.४८ (जुना ४) चे सहापदरीकरणाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात आले आहे.

सदर राष्ट्रीय महामार्गाच्या पुणे-सातारा कि.मी.७२५/०० ते ८६५/३५० दरम्यान करण्यात येत असलेल्या सहापदरीकरणाच्या कामांतर्गत VUP/Flyover बांधून मिळण्याची मागणी मौजे वर्वे ता.भोर, येथील ग्रामस्थांनी मार्च/एप्रिल २०१९ मध्ये केली असल्याचे प्रकल्प संचालक,भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,पुणे यांनी कळविले आहे.

(२), (३) व (४) विषयांकित सहापदरीकरणाच्या मंजूर करारनाम्यानुसार दोन VUP मधिल अंतर २ कि.मी. पेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. तथापि मौजे वर्वे येथील ग्रामस्थांनी VUP साठी मागणी केलेले ठिकाण हे कि.मी.८१५/०३० येथे असून सदर ठिकाण हे सदयस्थितीत सुरु असलेल्या पुणे-सातारा सहापदरीकरणांतर्गत मंजुरीनुसार कि.मी.८१५/४५० ठिकाणी बांधण्यात येत असलेल्या VUP च्या ठिकाणापासून सुमारे ४२० मीटर अंतरावर आहे. यास्तव मौजे वर्वे येथील ग्रामस्थांच्या मागणीची पूर्तता विषयांकित सहापदरीकरणांतर्गत होऊ शकत नाही, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,पुणे यांनी कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्गाच्या सहापदरीकरणाच्या कामाबाबत

**(७५) * १४०१४८ श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे-सातारा या राष्ट्रीय महामार्गाचे काम मंजूर आराखड्याप्रमाणे करण्यात आले नसुन या कामामध्ये अनियमितता केल्याने या प्रकरणी त्रयस्थ पक्षामार्फत चौकशी करण्याची मागणी तेथील लोकप्रतिनिधींनी वारंवार शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्याचे काम केव्हा सुरु करण्यात आले होते व कामाची सद्य:स्थिती काय आहे तसेच सदर काम कधीपर्यंत पूर्ण होणे अपेक्षीत आहे,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून उक्त रस्त्याच्या कामात अनियमितता करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

राष्ट्रीय महामार्ग क्र.४८ (जुना रा.म.क्र.४) मधील पुणे-सातारा या भागातील सहापदरीकरणाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे.

सदर प्राधिकरणाचे संबंधित प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी सदर बाब खरी नसल्याचे कळवून कि.मी.७२५/०० ते ८६५/३५० मधील काम मंजूर करारनाम्यानुसार तसेच विहित विनिर्देशानुसार करण्यात येत असल्याचे कळविले आहे.

(२) सदर रस्त्याच्या कामासाठी ०१.१०.२०१० रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले होते.

सदयस्थितीत सदर काम भौतिकदृष्टया ९५.१० टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित काम ३०.०६.२०१९ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजामार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे खडवली (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील जमिनीच्या गैरव्यवहाराबाबत

**(७६) * १३८५७९ श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे खडवली (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील स.नं.१३ पैकी क्षेत्र ०-८१-० पोट खराब ०-०९-१० आकार या शासकीय जमीनीच्या सातबारावर अवैधरित्या ज्योती विश्जीत सरकार, वैजंती प्रदीप मंत्री, शामल ताम्हाणे, सुधीर शांताराम गुप्ते यांच्या नावाने सामाईक क्षेत्र अशी नोंद घेण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमीन महसूल विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अवैधरित्या संगमताने ज्योती विश्वजीत सरकार व इतर तीन जणांच्या नावे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त जमीन अवैधरित्या संबंधितांच्या नावावर करणाऱ्या अधिकारी व इतर संबंधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) सदरची बाब माहे एप्रिल २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे नाही.

मौजे खडवली, ता.कल्याण, जि.ठाणे येथील फेरफार क्र.३२, दि.२०.०६.१९५७ पाहता स.नं. १३ पै. ही जमीन मुंबई जात इनाम नष्ट करणेंचा कायदा, १९५२ च्या कलम ७ प्रमाणे सरकारच्या मालकीची झाल्याचे दिसून येते. तद्नंतर गावदप्तरी नोंदविलेला फेरफार क्र. ७६, दि.२५.११.१९५७ पाहता बॉम्बे लँड रिव्हेन्यू कोड च्या कलम ३७(२) अन्वये चौकशी होऊन सदर मिळकतीवरील सरकार हक्क अमान्य करण्यात आल्याचे व गजानन अप्पाजी गुप्ते यांचे नाव खातेदार म्हणून दाखल केल्याचे दिसून येते. तद्नंतर फेरफार क्र. ८०, दि.०७.११.१९५९ अन्वये वाटणीपत्राने गजानन अप्पाजी गुप्ते यांनी आपल्या मुलांना जमिनी वाटून दिल्याचे व त्यात स.नं. १३ पै हा शांताराम गजानन गुप्ते यांच्या वाटणीस आल्याचे दिसून येते. परंतु, सदर दोन्ही फेरफाराचा उक्त स.नं. १३ पै च्या अधिकार अभिलेखात गा.न.नं. ७/१२ वर अंमल झालेला नाही.

जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या दि.११.०१.२०१६ च्या व तहसिलदार, कल्याण यांच्या दि.३१.०१.२०१८ च्या पत्राच्या अनुषंगाने गावदप्तरी फेरफार क्र.१६८१, दि.०६.०२.२०१८ नोंदविण्यात आला आहे. सदर फेरफारान्वये फेरफार क्र.७६, दि.२५.११.१९५७ व ८०, दि.०७.११.१९५९ या मंजूर फेरफारांचा उक्त स.नं. १३ पै च्या अधिकार अभिलेखात गा.न.नं. ७/१२ वर अंमल देण्यात आला असून स.नं. १३/२ (जुना स.नं.१३ पै.) हा वाटणीपत्राने श्री.शांताराम गजानन गुप्ते यांच्या वाटणीस आला असल्याने व ते मयत असल्याने त्यांचे वारस म्हणून (१) सुधीर शांताराम गुप्ते, (२) वैजयंती प्रदीप मंत्री, (३) ज्योती विश्वजित सरकार (४) श्यामल चंद्रशेखर ताम्हणे यांची नावे दाखल करण्यात आली आहेत.

-----------------

## कारपा ते असोला (ता.मानोरा, जि.वाशिम) येथे रस्त्याचे सुरु असलेले काम निष्कृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत

**(७७) * १४००२४ श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कारपा ते असोला (ता.मानोरा, जि.वाशिम) येथे रस्त्याच्या रुंदीकरणाचे सुरु असलेले काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत नागरिकांनी दिनांक २३ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडे तक्रार केली आहे, हे खर आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने या रस्त्याचा दर्जा व गुणवत्तेची तपासणी शासनाने केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार या रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) याबाबत लेखी तक्रार प्राप्त झालेली नाही. ग्रामस्थांनी तोंडी समस्या मांडली होती.

स्थानीक लोकांची कामाबाबत तक्रार होती. तेंव्हा प्रत्यक्ष मोक्यावर लोकांना काम अंदाजपत्रकातील तरतूदी प्रमाणे व विनिर्देशाप्रमाणे होत असल्याचे समजावून त्यांचे समाधान करण्यात आले.
(३) व (४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## राज्याच्या आरोग्य विभागातील तज्ञ डॉक्टरांची पदे भरण्याबाबत

**(७८) * १४२२२५ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या आरोग्य विभागातील सुधारित आकृती बंधानुसार विशेष आरोग्य सेवा देण्यासाठी सुमारे १४४४ तज्ञ डॉक्टरांची आवश्यकता असल्यामुळे एकूण ८२३ पदे मंजूर केली असताना त्यापैकी केवळ ४८५ पदे भरण्यात आली असुन ३९८ पदे अद्यापि रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुधारीत आकृतीबंधानुसार एकूण ९५९ पदांचा अभाव असून बालरोगतज्ञ, फिजिशियन्स, स्त्रीरोगतज्ञ व शल्यचिकित्सक या महत्वपूर्ण संवर्गातील पदे रिक्त असल्यामुळे ग्रामीण व आदीवासी भागातील रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार सदरहू रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे,

राज्याच्या आरोग्य विभागात महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा,गट-अ मधील (ग्रेड वेतन रु. ६६०० व त्याहून अधिक) विशेषज्ञ संवर्गात एकूण ६२७ पदे मंजूर असून त्यापैकी १३८ पदे भरलेली आहेत. तसेच ४८९ पदे रिक्त आहेत.

तसेच महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा,गट-अ (ग्रेड वेतन रु. ५४००) मध्ये विशेषज्ञांची २८०० पदे मंजूर असून त्यापैकी १९११ पदे भरलेली आहेत व ८८९ पदे रिक्त आहेत. आयपीएचएस अंतर्गत विशेषज्ञांची ७८९ पदे मंजूर असून त्यापैकी ७१४ पदे भरलेली आहेत व ७५ पदे रिक्त आहेत.

(२) हे खरे नाही,

विशेषज्ञांची पदे रिक्त असली तरी आयपीएचएस अंतर्गत कंत्राटी विशेषज्ञांची सेवा तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत विशेषज्ञांच्या सेवा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे कोणताही रुग्ण उपचारापासून वंचित राहणार नाही तसेच रुग्णाची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (गेड पे रु.६६००) मधील जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी व विशेषज्ञ संवर्गातील पदे महाराष्ट्र लोकसवा आयोगाच्या कक्षेतून (दि.३०.९.२०२१ पर्यंत) वगळून ती निवड मंडळामार्फत भरण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार सदर पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच पदोन्नती कोटयातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा,गट-अ (ग्रेड पे रु. ५४००) मधील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्यासाठी ८७७ पदांकरिता जाहिरात दिली असून, निवड प्रक्रिया सुरु आहे.

तसेच गट-क व गट-ड संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे राहनाळ (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील सर्व्हे नं. १८३ या शासकीय जागेवर अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

**(७९) * १३६७८१ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे राहनाळ (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील सर्व्हे नं. १८३ या शासकीय जागेवर मे. महावीर गृहनिर्माण प्रा.लि. कंपनीने बेकायदेशिररित्या भरणी करून अनधिकृत बांधकाम केले असून सदर बांधकाम निष्कासित करण्याबाबत तहसीलदार, भिवंडी यांच्याकडे मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार सदर शासकीय जागेवर अनधिकृत बांधकाम करणाऱ्या संबंधित कंपनीच्या संचालकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) मौजे राहनाळ, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील स.नं. १८३ क्षेत्र ०-१६.० हे-आर या शासकीय जमिनीच्या उत्तर दिशेला नारपोली गावची शीव असून पूर्व, पश्चिम व दक्षिण दिशेला स.नं. १२७ पैकीची खाजगी बिनशेती जमीन आहे. मौजे राहनाळ येथील सरकारी स.नं. १८३ ही जागा खुली असून स.नं. १२७/३ च्या लगत असल्याने सदर शासकीय जागेच्या काही भागावर बांधकाम झाले आहे किंवा कसे याबाबत स्पष्टता होण्यासाठी सदर जागेची मोजणी होणे आवश्यक असल्याने सदर जमिनीची तातडीने मोजणी करण्याबाबत तहसिलदार, भिवंडी यांनी उप अधिक्षक भूमि अभिलेख, भिवंडी यांना कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तिलारी (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत

**(८०) * १३७१२५ श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिलारी (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) प्रकल्प हा गोवा व महाराष्ट्र राज्याचा संयुक्त प्रकल्प असून गत ४० वर्षापासून या प्रकल्पासाठी या परिसरातील शेतकऱ्यांच्या जमिनी, वाडया, वस्त्या संपादीत करुन प्रकल्प पूर्ण केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील ४० वर्षापासून तिलारी प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने स्थानिक प्रकल्पग्रस्तांचे योग्यरित्या पुनर्वसन होण्याच्यादृष्टीने शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यात मृद संधारण विभागात झालेला गैरव्यवहार

**(८१) * १३४९६९ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.पंकज**

**भुजबळ (नांदगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.मनोहर भोईर (उरण), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यात मृद संधारण विभागात २५ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माजी कृषी उपसंचालक यांच्या समितीमार्फत करण्यात आलेल्या चौकशीत निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहार प्रकरणात जबाबदार असलेल्या संबंधित विभागाच्या २९ अधिकारी व कर्मचा-यांवर गुन्हे दाखल करुन याबाबत चौकशी करण्याचे आदेश (१०१६ प्र.क्र.११४) कृषी विभागाचे सचिव आणि कृषी आयुक्त यांनी दिनांक १२ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास विभागीय मुख्य अधिका-यांना दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्याचे निष्कर्ष काय आहेत,

(४) असल्यास, त्यानुसार या गैरव्यवहारातील संबधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अनिल बोंडे :** (१) सन २०१०-११ मध्ये सोलापूर जिल्हयातील मंगळवेढा व मोहोळ तालुका कृषि अधिकारी कार्यालयांतर्गत मृद व जलसंधारणाच्या कामांमध्ये अनियमितता झाल्याची शक्यता असल्याचे तत्कालीन उपविभागीय कृषि अधिकारी, सोलापूर यांनी केलेल्या प्राथमिक चौकशीमध्ये आढळून आले आहे.

(२), (३) व (४) या प्रकरणातील संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत दि.१५.१०.२०१८ च्या पत्रान्वये आयुक्त (कृषि) यांना आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार याप्रकरणी २९ अधिकारी/ कर्मचाऱ्यांविरुध्द पोलीस स्टेशन, मंगळवेढा येथे एफ.आय.आर. क्र.०१५६, भारतीय दंड संहिता १८६० अंतर्गत कलम ४०३, ४०९, ३४ अन्वये दि.०१.०४.२०१९ रोजी फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच आयुक्त (कृषि) यांनी दोषी अधिकारी / कर्मचाऱ्यांविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम-८/१२ अन्वये दि.१७.०२.२०१७ च्या ज्ञापनान्वये विभागीय चौकशी सुरु केली असून दि.८.३.२०१९ च्या आदेशान्वये चौकशी अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. चौकशी अधिकारी यांचा चौकशी अहवाल शासनास अद्याप प्राप्त झालेला नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पोयनाड-नागोठणे (जि.रायगड) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(८२) * १४२०१३ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पोयनाड-नागोठणे (जि.रायगड) या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे रस्त्यावरून प्रवास करणे गैरसोयीचे झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार या रस्त्याची तातडीने दुरूस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, अंशतः खरे आहे.
(२) व (३) सदर रस्त्यावर सन २०१८-१९ मध्ये अतिवृष्टी व अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे क्षतिग्रस्त लांबीतील खड्डे खडी व डांबराने भरुन रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

सद्य:स्थितीत रस्त्याच्या खड्डे भरलेल्या लांबीमध्ये डांबरीकरणाचे काम प्रगतीत आहे.

प्रश्नांकित पोयनाड-नागोठणे रस्त्याचे डांबरीकरण व मजबुतीकरणाचे काम हायब्रिड ॲन्युईटी अंतर्गत मंजूर असून निविदा प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करुन काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हंगीरगे-गावडेवाडी (ता.सांगोला, जि.सोलापूर) या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत

**(८३) * १४२१९० श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हंगीरगे-गावडेवाडी (ता.सांगोला जि.सोलापूर) या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून रस्त्याच्या साईडपट्टीचे काम केले नसल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार हंगीरगे ते गावडेवाडी या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या ठेकेदार व सार्वजनिक बांधकाम विभागातील संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) जिल्हा परिषदेमार्फत सदर रस्त्याची पाहणी करण्यात आली आहे.

(३) व (४) हंगीरगे-गावडेवाडी हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.४६ असून जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत आहे. या रस्त्यावर जिल्हा परिषद व सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत कोणत्याही प्रकारचे काम करण्यात आलेले नाही. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.